# अथातो धर्मजिज्ञासा

## यजुर्वेद

## हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म



कुमारी शक्तिलीला (निकिता राजेश पाटील)

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# अथातो धर्म- जिज्ञासा-२

(हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म)

निकिता राजेश पाटील

**एका विद्यार्थिनीने** लिहीलेलं हे पुस्तक.

तुम्हाला विनामूल्य वाचायला देण्याचा एकच हेतू आहे, तो म्हणजे तुमचा अभिप्राय जाणून घेणं. या विचारांच्या जडणघडणीत सुजाण वाचकांच्या सूचनांचा आभारपुर्वक समावेश करणं.

वाट पहातो आहोत. फ़ोन, whatsapp, email साधे पत्र कोणत्याही पद्धतीने आपला अभिप्राय नक्की पोहोचवा.


निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ,
वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503
फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com

# अथातो धर्म- जिज्ञासा- २

## (हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म)


निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ, वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com



**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :
www. esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
eternity,
eleventh floor,
eastern express highway,
Thane. 400604

प्रकाशन : १२ मे २०२२ (मोहिनी एकादशी शके १९४४)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

*अथातो धर्म- जिज्ञासा- २*

# यजुर्वेद

*(हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म)*

-निकिता राजेश पाटील

**परिचय :** नाव:-निकिता राजेश पाटील.



वांगणीत वास्तव्य.

"कुमारी शक्तिलीला" या नावाने कविता लेख कथांचे लेखन.

**वाड्मयीन परिचय-**

१. चंद्रिका अशा मासिकात श्लोक लेखन.

२. टिळक नगर सांस्कृतिक महोत्सवात 'द्रौपदीचे स्वगत' या एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण. (वेशभूषा, प्रयोग लेखन, फार्सलेखन यांचा मेळ )

३. विद्याविकास संस्थेच्या वार्षिकात (सांवत्सरिकात) रौप्य महोत्सवानिमित्त 'द्रौपदीचे आत्मकथन हा ललित लेख, 'मनाचे प्रदुषण' ही कविता व 'बायको नावाचं अजीब रसायन' ही विनोदी कथा प्रकाशित.

४.	डोंबिवलीतील आणि बदलापुरात काव्य संमेलनात सक्रिय सहभाग.

६. अनेक निबंध, वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक.

७.	संस्कृत भाषेतील ‘अमृत गौरव’ पुरस्कार,

८.	अस्मिता या हस्तलिखित सांवत्सरिकात नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर या लेखाचे लेखन,

९.	मानव विद्या विभागात वाचन संस्कृती’ डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाचे महत्त्व या विषयांवर संशोधन.

१०. ‘फार फार वर्षांपूर्वी’ व ‘संघर्ष’ ,’ सीमान्त’ या तीन पुस्तकांवर केलेली समीक्षा. त्यातील संघर्ष’ या समीक्षाला पुरस्कार प्राप्त.

११. मनोजन’ या मासिकात मानसिक आरोग्याचा मूलमंत्र या विषयावर लेख. सृजन या वार्षिकात कविता आणि लेख प्रकाशित.

१२. चित्रकलेत गोल्ड मेडल.

१३. ई साहित्यावर एक रहस्य कथासंग्रह, दोन कादंबऱ्या (द्रौपदी वर आधारित), अद्भुत कथासंग्रह, विडींबन काव्य संग्रह, चार आध्यात्मिक

ग्रंथ, एक विज्ञान लेखमाला, अशी एकूण अकरा पुस्तके प्रकाशित झाली.

१५. अथातो धर्म जिज्ञासा’ या हिंदू तत्त्वज्ञान आणि अध्यात्म विषयावर प्रबंध.

१६. महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेच्या संकल्पना सादरीकरण स्पर्धेत द्वितीय क्रमांक.

वाचन:- मी आजपर्यंत विविध प्रकारची पुस्तके वाचली आहेत. त्यातील सगळ्यात जास्त महाभारताची पुस्तकं आहेत.

शिक्षण:- एसवाय बीए,

फोन नंबर:- ८६८९९५४८०६👸 👰 👸

# अर्पणपत्रिका

***माझ्या प्रेमळ, स्नेहलता, मनस्विनी, मेधावी, महाभारतील सारमौक्तिकांचे ज्ञान प्रदान करणाऱ्या, अध्यात्म आणि गृहस्थाश्रम यांना एकाच गाडीची चक्रे बनविणाऱ्या विश्वातील रहस्ये उलगडून देणाऱ्या, माझ्या मातेला व गुरुला हा संशोधन प्रबंध समर्पित.***

***तुझी पुत्री आणि शिष्या,***

***कुमारी शक्तिलीला..***

# उपोद्घात



यजुर्वेद.

वेदवाङ्मयातला दुसरा वेद. हा अत्यंत महत्वाचा वेद मानला जातो, कारण या वेदाने मूळ यज्ञ संस्कृतीला अधिक समृद्ध केले, विभिन्न प्रकारच्या परंपरांची निर्मिती केली आहे.

तसं पाहता, ऋग्वेदाच्या प्रथम मंडलाच्या प्रथम सूक्तामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की

"अग्निनामीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम् |"

म्हणजे ऋग्वेदकाळातच यज्ञ संस्कृतीचा उदय झाला होता, अगदी प्रारंभीच्या काळातच.

*म्हणजेच आपली हिंदू वैदिक भारतीय संस्कृती यज्ञव्यवस्थेच्या पायावर आधारित आहे.*

*धर्माचे अग्निहोत्र असो,कर्माचा यज्ञ असो,स्त्री शक्तीचा, चंडी याग असो,संकल्पाची ज्वाला असो, शस्त्राची शलाका असो वा क्रांतीची मशाल असो,या अशा विभिन्न रूपांमध्ये यज्ञच सामावलेला आहे.*

*विज्ञान, तत्वज्ञान, अध्यात्म, भौतिकशास्त्र, शरीर शास्त्र आणि मानसिक दृष्ट्या यज्ञव्यवस्था अत्यंत महत्त्वाची आहे.*

*वैज्ञानिक दृष्ट्या,भौतिक दृष्टीने व शरीरशास्त्रीय दृष्टीने पाहिल्यास यज्ञ केल्यास शरीरातील सर्व स्थानांची शुध्दी होते,कीटक, जीवजंतू व विषाणू नष्ट होतात. आजूबाजूचे वातावरण शुद्ध होते.*

*आध्यात्मिक दृष्टीनेही यज्ञाचे महत्त्व कथन करावे तेवढे थोडेच आहे. यज्ञामुळे वातावरणच नव्हे तर मन,आत्मा,विचार व भावना, प्रेरणा, वर्तन शुद्ध व पवित्र होते.*

तात्वज्ञानिक दृष्टीने पाहता,यज्ञ हा शब्द यज् या उभयनेपदी धातुपासून निर्माण झाला आहे, ज्याचा अर्थ असा आहे की 'होत्र करणे,आहुती देणे.'

आणि यज् या शब्दाचा विग्रह केल्यास य या शब्दाचा अर्थ आहे 'जो' व ज् या मूळ धातुचा अर्थ 'त्याग करणे आणि अर्पण करणे असा होतो.

याचाच अर्थ यज्ञव्यवस्था ही मुळातच त्याग, समर्पण, शुध्दता, धर्म, सत्य, ओज, ज्ज्वाजल्य व दृढ संकल्प या पवित्र मूल्यांवर आधारित आहे.

ऋग्वेदाप्रमाणे यजुर्वेदाचे अनेक यजुष हे ऋषिकांनी लिहिले आहेत. जसं की त्रिशिरा, गायत्री, काश्यपी, शिखंडिनी,शश्वती, रोमेशा इत्यादी

# अथातो धर्म- जिज्ञासा- २

# यजुर्वेद

## हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म

*(संशोधनपर प्रबंध)*

यजुर्वेद हे हिंदू धर्माचे महत्त्वपूर्ण वेद वाङ्मय आहे. या वेदामध्ये यज्ञविधीचे संपूर्ण ज्ञान दिले आहे. यजुर्वेदामध्ये ऋग्वेदाचे ६६३ मंत्र प्राप्त होतात. मात्र तरीही यजुर्वेदाचे विशिष्ट स्वरूप लक्षणीयरित्या ओळखले जाते. कारण हा गद्यात्मक ग्रंथ आहे. यज्ञाकरिता बोलल्या जाणाऱ्या यजुर्वेदीय गद्यात्मक मंत्रांना 'यजुस' असे म्हटले जाते. यजुर्वेदाचे पद्यात्मक मंत्र ऋग्वेदात आणि यजुर्वेदामध्ये आढळतात. १९७५ कण्डिका, १९८८ ऋचा, ४० अध्याय, १९७५ मंत्र आहेत. यामध्ये स्वतंत्र पद्यात्मक मंत्र फारच अत्यल्प आहेत.

यजुर्वेद ह्या शब्दाची यजुस+वेद या शब्दापासून व्युत्पत्ती झाली आहे. 'यज' चा अर्थ समर्पण, कर्म, सेवा, तर्पण, हवन, श्राद्ध, योग, इंद्रियनिग्रह, हवन असा होतो. त्याकारणे यजुर्वेद म्हणजे कर्म वेद अथवा यज्ञवेद.

अग्निहोत्र, अश्वमेध, राजसूय, अग्निचयन-महाग्निचयन, सोमयज्ञ आणि वाजपेय अशा अनेक यज्ञाचे विवरण आढळते.

यजुर्वेदाच्या दोन शाखा आहेत. कृष्ण यजुर्वेद-ब्रह्म संप्रदाय आणि शुक्ल यजुर्वेद-आदित्य संप्रदाय.

तैतिरीय, मैत्रायणी, आपस्तम्ब, वाजसनेय, कठ आणि कपिष्ठल कठ ह्या कृष्ण यजुर्वेदाच्या पद्य संहिता, तर मध्यदिन, संहिता व काव्य संहिता ह्या दोन्ही संहिता शुक्ल यजुर्वेदाच्या आहेत.

आग्नेयी, काठक, कपिष्ठल, मैत्रायणी, तैतिरीय आणि वाजसनेयी ह्या यजुर्वेदाच्या प्रमुख शाखा आहेत.

## ऋषिका सार्पराज्ञी

हे ऋग्वेदातील दशम मंडलातील तर यजुर्वेदातील मैत्रायणी संहितेत सामवेदामध्ये रागायनीय शाखेत व अथर्ववेदामध्ये देवदर्शन शाखेमध्ये या ऋषिकेचे सूक्त आढळते. हे सूक्त ऋग्वेद वेदामध्ये सूर्यसूक्त ( व अथर्ववेद मध्ये) यजुर्वेदामध्ये अग्नीसूक्त व सामवेदामध्ये आत्मसूक्त म्हणून जाणले जाते. त्याचप्रमाणे चारही वेदाप्रमाणे ऋषिका सार्पराज्ञी, मात्र ऋग्वेदाप्रमाणे सूर्य ही देवता अथर्ववेदाप्रमाणे आदित्य ही देवता, सामवेदाप्रमाणे आत्मा ही देवता, तर यजुर्वेदाप्रमाणे अग्नी ही देवता आहे.

या सूक्तामध्ये तीन मंत्र आहेत. या सूक्तात तीन ऋचा असल्या तरी या ऋचांमध्ये गहन आशय आहे. या सूक्ताची ऋषिका सार्पराज्ञी आहे जिला ‘वाक्’ असे म्हटले जाते. सार्पराज्ञी ही सूर्य देवाची पुत्री आणि सूर्यमंडल व

अंतरिक्षाची मध्यमा आहे. ही ऋषिका अनेक मंत्राची द्रष्टी बुद्धिमती मानली जाते.

याखेरीज अशी ही कथा सांगितली जाते, सार्पराज्ञीला दिव्यदृष्टी होती म्हणून तिने संपूर्ण अंतरिक्षाचे निरीक्षण करून ते सूक्त लिहिले. हे सुक्त आध्यात्मिक दृष्ट्या, वैदिक दृष्ट्या, तत्त्वज्ञानाच्या दृष्टया, विज्ञान दृष्ट्या, खगोल शास्त्रीय दृष्ट्या, आत्मिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. म्हणूनच चारही वेदांमध्ये या सूक्ताचा उल्लेख आढळतो. हे सूक्त अग्निचे स्तवन करून आहुती देताना, यज्ञ करताना, प्रभात वंदना करताना, अर्ध्यदान करताना, सुर्य स्तुती करताना आणि आत्मचिंतन करताना पठण केले जाते.

ऋग्वेदाच्या तिसऱ्या मंडला नुसार सार्पराज्ञी ही वाक् असून अज्ञानहारी, अग्नीला प्रज्वलित करणारी, ऋषि

जमदग्नीपासून ज्ञान प्राप्त करणारी असून इंद्रादि देवतांना अंत:स्फुरित ज्ञान आणि क्षयारहित अमृत शब्द देत असते. सार्पराज्ञी खरे तर या ऋषिकेची वेद उपाधी होती, मात्र वास्तविक नाव ‘सूर्यपुत्री वाक्’ असे असण्याची शक्यता आहे.

‘सार्पराज्ञी' या शब्दाचा अर्थ सर्पणशील, सार्वत्रिक आणि दीप्त- प्रदीप्त सूर्याप्रमाणे तेजस्वी असणारी, ब्रह्मांडाचे ज्ञान प्राप्त करणारी, स्वतःच्या त्या प्राप्त झालेल्या ज्ञानाचा आपल्या आचरणाद्वारे उपदेश आणि बोध देणारी विदुषी (बुद्धिमती) होय. याशिवाय ‘सार्पराज्ञी’  या शब्दाचा अपभ्रंश  सार्व राज्ञी' असाही होतो. सार्व राज्ञी म्हणजे सूर्याची पुत्री, या नात्याने सर्वांची राज्ञी (देवतांची) असे असू शकते.वाक् म्हणजे वाणी हे तर सर्वविदित आहे. मात्र येथे देववाणी अथवा ऋषीवाणी असा अर्थ न घेता आपण सूर्य

लोकाची) अंतरिक्षाची वाणी असाही अर्थ घेऊ शकतो. त्या कारणाने या शब्दाची अशी व्युत्पत्ती  आहे.

ह्या सूक्ताच्या ऋचा पुढीलप्रमाणे:-

***आय गौ पृश्निरक्रमीदसन्मातरं पुर:|***
***पितरं च प्रयत्न्स्व:||***

***अन्तश्चरति रोचनास्य प्राणादपानती|***
***व्यख्यन्महिषो दिवम्||***

***त्रिंध्दाम वि राजति वाक्पतंगाय धीयते|***
***प्रति वस्तोरह द्युभि:||***

१) यातील पहिल्या ऋचेचा अर्थ पाहिल्यास हा वृषभाप्रमाणे वेगवान असलेल्या ठिपका पूर्वेकडे आलेला आहे, त्याची माता धरित्री आहे आणि त्याचा पिता स्वर्ग आहे. प्रथमतः सूर्य ही देवता म्हणून या ऋचेचा अर्थ असा आहे की सूर्य शक्तिमान व वेगवान असून तो पूर्वेला उदित होतो. त्याची माता पृथ्वी त्याला परिक्रमा करत त्याला आशीर्वाद देत असते, तर सूर्य स्वर्गामध्ये संचार करत असतो, कारण स्वर्ग त्याला पित्याप्रमाणे आश्रय देतो.

अग्नि ही देवता म्हणून पाहिल्यास अग्नी हा सर्वशक्तिमान असून ज्वलनशील आहे आणि त्याला पूर्वाभिमुखच प्रज्वलित केले जाते. धरती ही त्याची माता आहे कारण पृथ्वीच्या गर्भात अनंत स्तर (अग्नीचे) दडलेले असतात. याशिवाय स्वर्ग म्हणजे द्युलोक (प्रकाशाचा लोक)

हा त्याचा पिता आहे. अग्निदिव्य स्वयं प्रकाशमान आहे म्हणून त्याचा पिता द्युलोक आहे.

आत्मा ही देवता म्हणून पाहिल्यास आत्मा हा सर्व स्वरांनी- राग रागिण्यांनी युक्त असून वेगवान आहे. पुण्यात्मा हा पूर्वेकडून प्रवेशतो. त्याची माता ही प्रकृती आहे. कारण आत्मा हा पुरुष असल्याकारणाने त्याचा जन्म प्रकृतीपोटी झालेला आहे. याशिवाय स्वर्ग म्हणजे उच्चलोक हा आत्म्याचा जन्मदाता आहे.

आध्यात्मिक दृष्टीने पाहिल्यास महान परमात्मा हा सर्वश्रेष्ठ आणि सर्वशक्तिमान असून त्याचे सृष्टीच्या सृजना पासून सृष्टीच्या विनाशापर्यंत अस्तित्व असते. त्याची माता परम प्रकृती ही आदिशक्ती आणि सृजनाच्या मुख्य स्त्रोत आहे. त्याचा पिता म्हणजे अन्य काही नसून शून्य आहे. हा

परमात्मा जन्मापासून मृत्यूपर्यंत प्रत्येक जीवाच्या जीवनात विभिन्न बोध, ज्ञान, प्रकाश, सुख, आनंद आणि संतोष प्रदान करत असतो.

२) दुसऱ्या ऋचेचा अर्थ पाहिल्यास ज्याक्षणी तो ठिपका श्वास घेतो, त्याक्षणी जणू धरित्रीला पुनर्जीवन प्राप्त होते, सुस्पष्ट गोल असलेली पृथ्वी ठिपक्याभोवती परिक्रमा करते. तो ठिपकाच अंतरिक्षाचा केंद्रबिंदू असून सर्वत्र प्रकाश देत असतो, विभिन्न रंगानी, जीवानी भरलेला असा तो पृथ्वीलोक आहे.

ही ऋषिका अशी पहिलीच जिने सूर्य अर्थात त्या ठिपक्याची मानविकीकरण केले आहे. याशिवाय तिने असे प्रतिपादन केले आहे की सूर्य व पृथ्वीचा आकार गोल आहे. सूर्य श्वास घेतो

म्हणजेच प्रकाश प्रदान करतो याशिवाय तोच अंतरिक्षाचा केंद्रबिंदू आहे. त्याच्याभोवती पृथ्वी परिभ्रमण करत असून या पृथ्वीवर विभिन्न जीव वास करत असतात.

प्रथमतः सूर्य ही देवता म्हणून सूर्य ज्याक्षणी श्वास घेतो म्हणजेच उष्णता व प्रकाशकिरणांचे आदान-प्रदान करतो, त्याक्षणी पृथ्वीला नवजीवन प्राप्त होते. ती माता असल्याकारणाने तिला आपल्या शिशुने श्वास घेतल्या कारणे पुनर्जीवन प्राप्त होते. मनात कुठलीही कापट्य नसलेली पृथ्वी सूर्याभोवती परिक्रमा करून त्याला प्रत्येक दिशेने आशिष देत असते. सूर्य हा अंतरिक्षाचा केंद्रबिंदू असून सर्वत्र प्रकाश देत असतो. विभिन्न जीवांनी पृथ्वी भरलेली असते.

अग्नी म्हणून ही देवता पाहता सूर्य हाही अग्नीचाच गोळा असतो. अग्निने श्वास घेताच आपल्या ज्वालांनी भूतलावर पवित्र ऊर्जा प्रसूत केल्यास पृथ्वीला त्याचा अभिमान वाटतो. अग्नीभोवती पृथ्वीवरचे जीव, पती-पत्नी, यजोमान- यजोमती, बालक- बालिका आणि कुमारिका ही आशीर्वादाकरिता परिक्रमा करतात. अग्नी हा पंचमहाभूतांचा मध्यबिंदू असून प्रकाश देत असून पृथ्वीवरचे जीव स्वभावांनी, आकारांनी, रंगानी भरलेले असतात.

आत्मा म्हणून ही देवता पाहिल्यास आत्म्याने श्वास घेताच म्हणजेच देहात प्रवेश करताच प्रकृतीला जणू पुनर्जीवन -पुनश्च सूर मिळतो. प्रकृती ही त्याच्याभोवतालीच असते. आत्मा म्हणजे पुरुष हा जगताचा केंद्रबिंदू असून प्रकृती

त्याहीपेक्षा सर्वोच्च स्थानी असते. आत्मा सर्वत्र प्रकृतीत ज्ञानाचा प्रकाश प्रस्तुत करत असतो. आत्मा निराकार, निर्विकार असूनही प्रकृती विविध स्वभावांनी, तत्त्वांनी, आकारांनी, विचारांनी, देहांनी आणि जीवांनी भरलेले असते.

अध्यात्म दृष्टीने परमात्म्याने प्रथमतः सृजन केल्यास परम प्रकृतीला त्यांच्या कार्याबद्दल अत्याधिक आनंद होतो व अभिमानही वाटतो. कुठल्याही प्रकारचा विकार नसलेली पृथ्वी परम प्रकृती परमात्म्याच्या भोवती असते व त्याच्यातही समाहित असते. त्या कारणाने ते उभयंता या ब्रह्मांडाचे केंद्रबिंदू आहेत. परमात्मा परम प्रकृतीच्या आशीर्वादाने सर्वत्र ज्ञान, परमानंद प्रसृत करत असतो. याशिवाय परमप्रकृतीचे कार्य विभिन्न लीलानी संपृक्त असते.

३) यातील अंतिम म्हणजे तिसऱ्या ऋचेचा असा अर्थ आहे की हे गीत अथवा उत्तम सूक्त सर्वश्रेष्ठ सत् वाक् म्हणजे सार्पराज्ञीला ती स्वयंच अर्पण करते आहे. ही सार्पराज्ञी (सत् वाणी) आणि तो ठिपका (जो तेजस्वी आहे) तीस दिनांपर्यंत (दर सौरमासी) ज्ञानप्रकाश देत राहाते. तेच ज्ञान व प्रकाश त्या दिनांमधील शोक व दुःखाचे खंडण करतात.

ह्या ऋचेचा व्यवस्थित व सुक्ष्म अभ्यास केल्यास असे दिसून येते की सार्पराज्ञी ऋषिकेने प्रथमतः सौर मासांच्या सौर कालगणनेच्या चक्राविषयाचे ज्ञान कथन केले होते. चांद्र मासामध्ये चंद्राच्या कलेप्रमाणे १५ दिन सौर मासामध्ये सूर्याच्या रश्मी (किरणांप्रमाणे) ३० दिन असतात. चंद्राचा उदय -अस्त पौर्णिमा- अमावस्येला

होत असतो. त्याचप्रमाणे सूर्याचा अखंड प्रवास तीस पर्यंत चालूच असतो, असे तिने प्रतिपादन केले आहे.

प्रथमतः सूर्य ही देवता म्हणून पाहिल्यास, हे सूक्त अंतरिक्षाच्या अथवा सूर्य लोकाच्या वाणीला समर्पित केलेले आहे. ही अंतरिक्ष वाणी आणि सूर्य देव आपल्याच मासाच्या तीस दिनापर्यंत अविरतपणे ज्ञान व प्रकाश देत राहते. हे ज्ञान व प्रकाश, अज्ञान आणि अंधकाराला नष्ट करतात.

अग्नि म्हणून ही देवता पाहिल्यास, हे सूक्त तिच्या तेजस्वी वाणीला अथवा यजुस् मंत्रांच्या जननीला अर्पित आहे. ही यजुस मंत्रवाक् व अग्निदेव सौरमासांच्या तीस दिनांपर्यंत ऊर्जा, शक्ती, सामर्थ्य आणि प्रखर वाणी प्रदान करत असतात. कारण यज्ञाच्या स्तंभ ज्याला यूप असे

म्हटले जाते. हा यज्ञाच्या स्तंभ तीस-तीस दिवसांच्या अंतराने उभारला जातो. असे शत यूप उभारले तर शतमेध यज्ञ पूर्ण होतो. असेच सहस्त्र यूप उभारले तर देवसहस्त्रयाग पूर्ण होतो. अशाच अर्धयूप अथवा एक यूप उभारला तर दर दिनीचे अग्निहोत्र नियमित चालू राहते. अग्निचे तेज व उर्जा हे दुष्ट, अपवित्र शक्तींना, विचारांना, कृतींना नष्ट करणारे असते वा पापक्षालन करणारे असते.

आत्मा ही देवता म्हणून पाहताना, हे सूक्त आत्मवाणीला आणि सप्तसूरांच्या राज्ञीला- देवी गानरतेला अर्पित केले आहे. ही आत्मवाणी व आत्मा आपल्या मनाच्या १५ कलांच्या द्वय भागांमध्ये म्हणजे ३२ नाड्यांमध्ये विचारांच्या प्रवासाचा वेग, उत्तम वळण, सूर, ज्ञानमार्ग व मोक्षेच्छा प्रदान करत असते. हे उत्तम वेग

व सूर मनाची विकारधीनता दूर करते व नाड्यांचा जागृतीस सहाय्य करते.

खरं पाहता, मनाच्या ज्याप्रमाणे ३२ नाड्या असतात. उदा. पृथा, कल्याणी, सूर्यमुखी, चंद्राकली, हस्तिनी त्याप्रमाणेच ३२ कला म्हणजे रश्मी असतात. मी या रश्मी दिन म्हणून गृहित धरले आहेत, अन्यथा सूर्य हा सहस्त्र रश्मी आहेच. ह्यातील २ कला ग्रहणाच्या असल्याकारणे त्या दिनांना मासाबाहेरील विशिष्ट दिन म्हणून गृहित धरतात.उदा. सर्व मासांचे दिन पूर्ण करणारे ग्रहण (विशेष)

त्यानंतर अध्यात्मदृष्टीने पाहिल्यास परमात्मा हे स्तुतीपर सूक्त परमवाणी असणाऱ्या सत् वाक् अर्थात परमप्रकृतीला अर्पण करतो आहे. परमात्मा असे स्वयम् जीवांना सांगत आहे की मी आणि देवी सत् वाणी परमप्रकृती तुम्हा सर्वांच्या मन भावना आणि विचारांत राहून तीस मुहूर्तांपर्यंत (पवित्र) तुम्हा सर्वांना शाश्वत ज्ञान देण्याच्या प्रयास करू,

जोपर्यंत तुम्ही सर्वजण या शरीराच्या आश्रयात राहून मोक्षाकरिता जागृत होत नाहीत. तुम्ही हे लक्षात ठेवा, हे शाश्वत ज्ञान शोक व दुःखाचे निवारण करणारे असते.

मी येथे एक स्पष्टीकरण देत आहे हे मुहूर्त ३० या प्रकारे आहेत:- ब्रह्म, रुद्र, आहि, मित्र, मातृ-पितृ, वसु, वाराह, विश्वेदेवा, विधि, सतमुखी, पुरूहूत, वाहिनी, नक्तवतकरा,वरूण, अर्यमा, भग, गिरीश, अजपाद, अहिबुध्न्य, पुष्य, आश्विनी,यम, अग्नि, विधातृ, आदिती, अमृत अथवा जीव, विष्णू, समुद्रम हे सर्व मुहूर्त वेदांमध्ये उल्लेखित आहे.

## *मेधा सूक्त*

मेधा सूक्त हे शुक्ल यजुर्वेदातील असून ते काव्य संहितेत आढळते. हे सूक्त काव्य संहितेतील अध्याय ३२ व्या तील असून ह्या सूक्ताच्या ऋचा ४ आहेत. या सूक्तातील ऋचा अध्याय ३२ मध्ये १२ ते १६ वे मंत्र आहेत. हे मेधा सूक्त अत्यंत महत्वपूर्ण असून हयाचे पठण देवी सप्तशती, देवी माहात्म्य, शारदा वंदना, कार्तिकेय स्तोत्र, प्रज्ञा विवर्धन स्तोत्रासह केले जाते.

हे सूक्त वेगळ्या रूपात मात्र तीन विस्तृत ऋचांमध्ये कृष्ण यजुर्वेदातून उत्पन्न झालेल्या महानारायण उपनिषदामध्येही आढळते.

याखेरीज शुक्ल यजुर्वेदातील हे मेधा सूक्त-त्यातील तिसरा मंत्र अथवा ऋचा बालकाचे विद्याग्रहण, जातकर्म,

आयुष्य-करण आणि मेधाजननासाठी- या सर्व जात कर्मासाठी-संस्कारासाठी पठण केले जाते, तेही विधिवत.

'मेधा' या शब्दाचा असा अर्थ होतो की धारणा शक्ती, प्रज्ञा, बुध्दि, ज्ञान, विश्लेषता ही सर्व श्रेष्ठ 'मेधा' शक्ती ज्या विदुषी/विद्वानाला प्राप्त होते, त्याला मेधाविनी अथवा मेधावी म्हटले जाते.

मेधा प्राप्त करण्यासाठी ब्राह्मण अथवा क्षत्रियाच्या मार्गदर्शनाखाली यज्ञ करावा अथवा प्रायदिन यज्ञ म्हणजे अग्निहोत्र करणे व त्या होत्रात आहुती देताना मेधा सूक्ताची तीन रुपे- शुक्ल यजुर्वेदीय, महानारायणीय व तैतरीय ही मेधासूक्ते पठण करावीत.

मेधा वृध्दीकरिता बुध्दिमधील मन्दतारुपी, अल्प स्मरणशक्ती रुपी, वारंवार विस्मरणरुपी या दोषा्च्या

निवारणाकरिता, पवित्रता प्राप्त करण्याकरिता, ज्ञान विश्लेषण क्षमता ग्रहण करण्यासाठी व धारणा शक्तीची उर्जा वाढवण्याकरिता मेधा सूक्ताचे पठण केले जाते. मेधा सूक्तामध्ये मेधा प्राप्त करण्यासाठी देवी मेधा, स्वाहा, धात्री, इंद्र, वरुण, अग्नि आदि देवतांचे आवाहन व प्रार्थना केलेली आहे. ह्या सूक्ताची देवता मेधा असून ऋषिका ब्राम्हणी अथवा क्षत्राणी असेल. मेधा सूक्तामध्ये असाही उल्लेख आहे की मेधा सर्वप्रथम ब्राह्मण अथवा क्षत्रियांनी ग्रहण करावी, त्यानंतर त्यांनीच समाजास प्रदान करावी.

ह्या सूक्ताच्या ऋचा पुढीलप्रमाणे:-

***सदसस्पतिमदभुतम् प्रियमिन्द्रस्य काम्यम्।***

***सनिं मेधामयासिषम् स्वाहा॥***

***यां मेधां देवगणा: पितरश्चोपासते।***

***<u>तया मामद्य मेधयग्नि मेधाविनम् कुरु स्वाहा||</u>***

***<u>मेधां मे वरुणो ददातु मेधामग्निः प्रजापतिः|</u>***
***<u>मेधामिन्द्रश्च वायुश्च मेधां धाता ददातु मेस्वाहा||</u>***

***<u>इयं हे ब्रम्हच क्षत्रम् चोभे श्रियमश्नुताम्|</u>***
***<u>मयि देवता दधतु श्रियमुत्तमाम् तस्यै ते स्वाहा ||</u>***

या सूक्ताचा असा अर्थ आहे:-

१) पहिली ऋचा पाहिल्यास यज्ञगृहाचा पालनकर्ता, अचिन्त्य शक्तीने संपन्न असलेला, इंद्राचा मित्र व बंधु असणाऱ्या अग्नि देवाकडे मी धन ऐश्वर्याने समृद्ध असलेली, अनेक गुणांनी परिपूर्ण असलेली, धारणा शक्तीची स्वामिनी

असलेली मेधा मागत आहे. त्याकरिता ही सर्वश्रेष्ठ आहुती मी प्रदान करत आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास, सृष्टीची पालनकर्ता, अचिन्त्यनीय, अनाकलनीय शक्तीची स्वामिनी, विलक्षण असणाऱ्या परमात्म्याची परमप्रकृती असणाऱ्या देवता मेधेकडे- जी स्त्रियांमध्ये व देवीमध्ये श्रेष्ठ आहे. तिच्याकडे मी प्राप्त करण्यायोग्य, सेवनाकरिता योग्य असलेले ज्ञान, बुध्दि, विवेक, मेधा आणि पराविद्या मागत आहे. मला ध्यान धारणेकरिता उत्तम शक्ती द्यावी. म्हणूनच मी स्वतःच्या मनाचे हविष्य समर्पित करत आहे.

२) दुसरी ऋचा पाहिल्यास, हे मेधावी-मेधाविनी असलेले स्वाहादेवी व अग्निदेव! आपण मला अशी मेधा, प्रज्ञा, ज्ञान, धारणाशक्ती आणि

उत्तम बुध्दि प्रदान करुन मेधाविनी-मेधावी सर्व साधक लोकांना करावे, ज्या मेधेचे ग्रहण व काम देवता, मातृदेवता आणि पितृगण करत आहेत. त्याकरिताच मी आपणा उभयंतांना श्रेष्ठ आहुती देत आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास, हे मेधेची जननी-जनक परमप्रकृती व परमात्मा आपण उभयंतांनी योग्य साधक व विद्वान-विदुषीला अशी मेधा, प्रज्ञा, ज्ञान, धारणाशक्ती आणि पराविद्या प्रदान करावी, ज्या मेधेकारणे मोक्ष व सायुज्य मुक्ती प्राप्त होते. या मेधेचे सेवन देवता, मातृदेवता व पितृऋण करतात. याचाच अर्थ त्यांचा व मेधे चा आशिर्वाद साधकांना आहे.

३) तिसरी ऋचा पाहिल्यास, या ऋचेचा असा अर्थ आहे की वरुणदेव व त्याची पत्नी पर्षली अथवा वारुणिका! मला तत्त्वज्ञान समजण्याकरिता सक्षम असणारी मेधा प्रदान करावी, तसेच अग्नि व त्याची पत्नी स्वाहा आणि दक्षिणा, प्रजापति व त्याची पत्नी वीरगती अथवा प्रसूति, आपणही मेधा प्रदान करावी. हे विधाता आणि हे विधात्री! हे इंद्र तसेच शचि, हे वायु आणि स्वास्थी, शीतली, आपण मला मेधा प्रदान करावी. मेधा प्राप्त करण्यासाठी आपण सर्व देवतांना माझी ही सर्वश्रेष्ठ आहुती अर्पित आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास, विकारांचे नियंत्रक आणि नियंत्रिका! मला पराविद्येचे ज्ञान समजण्याकरिता सक्षम असणारी मेधा म्हणजे उत्तम बुध्दि प्रदान करावी. तसेच

परमात्मा आणि परमप्रकृती, हिरण्यगर्भ आणि हिरण्यमया अथवा देवी श्री, परमविधाता तसेच परमविधात्री, आदिशक्ती व आदिपुरुष तसेच योगमाया व योगपुरुष! मला म्हणजे अनंत साधकांना मेधा प्रदान करावी. आपण सर्वांना साधकांच्या समर्पणाची आहुती दिली आहे.

४) चौथी ऋचा पाहिल्यास, या ऋचेचा असा अर्थ आहे की ब्राह्मण आणि क्षत्रिय या दोन्ही उभयंता महत्वपूर्ण सामाजिक श्रेष्ठतर घटकांनी प्रज्ञा, लक्ष्मी, मेधा, ज्ञान, पराविद्या आणि सिध्दी ग्रहण करुन उपभोग घ्यावा आणि त्यानंतर समाजाला प्रदान करावी, ही संपत्ती, हे वैभव तसेच प्रज्ञा, मेधा, ज्ञान व पराविद्या, त्यानंतर हे लक्ष्मी देवी व देवगण! मला उत्तम विद्या, लक्ष्मी, मेधा, ज्ञान, सिद्धी आणि धन प्रदान करावे. मी

लक्ष्मीकरिता ही आहुती अर्पण करत आहे. (एक सर्वश्रेष्ठ आहुती)

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास, परमात्मा अथवा साधकाने ब्रम्हरंध (सहस्त्रार चक्र) आणि मेरूदंडाद्वारे (आज्ञाचक्र) परमप्रकृती अथवा योगिनीकडून प्रज्ञा, उत्तुंगया, मेधा, ज्ञान, पराविद्या व लक्ष्मीरुपी धैर्य-संयम ग्रहण करुन अंगी बाणवावे आणि तेच तेज अन्य चक्रे व शरीराकडे प्रसृत करावे. त्यानंतर आदिमायेने साधकांना लक्ष्मीप्रमाणे ज्ञान वैभव व प्रतिसाधन प्रदान करावे. मी म्हणजे साधक लक्ष्मी अर्थात आदिमायेला समर्पणाचे हविष्य प्रदान करत आहे.

ह्या सूक्ताच्या चारही ऋचा पठण करणे अत्यंत उपयुक्त आहे. विशेषतः विद्यार्थी, गुरुकुलाचे शिष्य, जीविका करणारे अथवा विशिष्ट ध्येय असणारे, साधक

इतकेच नव्हे तर योगी या सर्वांनी ह्या सूक्ताची साधना करावी, त्याकारणे त्यांना विद्या, तत्वज्ञान, जीवनदर्शन, परमात्मा तसेच ईश्वराला समजून घेण्याकरिता वारंवार मेधेचा उपयोग होतो. हे मेधा सूक्त विविध स्वरूपात ग्रंथांमध्ये आढळत असले, तरी त्यातील ऋचांचा अर्थ व आशय काही अंशी समान आहे.

अजून एक वैशिष्ट्य आहे या सूक्ताचे, ते वैशिष्ट्य हेच आहे की धाता, धात्री, स्वाहा, वरुण, चर्षली,वायु, स्वास्थी-प्रजापति अशा अनेक देवतांचे स्तवन केले आहे.

## राष्ट्रोत्थान प्रार्थना

ही राष्ट्र उत्थानाकरिता केलेली प्रार्थना आहे. ही प्रार्थना वाचता वरवर वाटेल की ही वर्णव्यवस्थेतील ज्येष्ठ व श्रेष्ठ घटकांना (फक्त) महत्त्व देणारी आहे. मात्र हे अर्धसत्य आहे राष्ट्रोत्थान प्रार्थनेत समाजाच्या प्रत्येक सामाजिक घटकाच्या हिताकरिता निर्माण केलेली आहे. इतकेच नव्हे तर निसर्गातील प्रत्येक पशुपक्षीच्या कल्याणाची व सुखाची प्रार्थना करणारे आहे. महाभारतातील दुष्यंत आणि शकुंतला यांच्या पुत्राच्या भरताच्या नावावरून आपल्या राष्ट्राचे म्हणजे देशाचे नाव भारत वर्ष अथवा भारत राष्ट्र असे नाव पडले अशी आख्यायिका आहे. ही संकल्पना ऋग्वैदिक काळापासून विद्यमान होती. उदाहरण वागाम्भृणी देवी वाक् अर्थात वागाम्भृणी देवी म्हणते आहे,

*<u>अहं राष्ट्री संगमनी वसूनाम चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम्|</u>*

याचा अर्थ- मीच राष्ट्री म्हणजे राष्ट्राची ईश्वरी-स्वामिनी असून राष्ट्रातील लोकांना जोडणारी आहे. मीच यजमानांना व साधकांना अभिष्ट असलेले वसुधन प्राप्त करुन देणारी आहे. याशिवाय मीच जिज्ञासुंना साक्षात कारण वाटणारे परब्रम्हही आहे आणि मीच यजमानांना उत्तम फल देते.

याखेरीज मी मागील भागात हिंदू आणि हिंदुस्थान या शब्दाची व्युत्पत्ती सांगितली आहे. हे अत्यंत महत्वपूर्ण शब्द अर्थात संकल्पना ऋग्वेदात आढळतात. ऋग्वेदातील बृहस्पती आगमातील भेदिनी कोशामध्ये असा श्लोक आढळतो.

*<u>हिमालय समारभ्य यावद् इन्दुसरोंवर|</u>*
*<u>तं देवनिर्मितम् देशं हिंदुस्थान प्रचक्षते||</u>*

याचा अर्थ हिमालयापासून इंदूसरोवरापर्यंत देवतांनी स्थापन केलेला देश अथवा राष्ट्र म्हणजे हिंदुस्थान.

शिवाचे प्रणयस्थान व गौरीचे जन्मस्थान असणाऱ्या हिमालयाला भारताची शिखा मानली जाते व इंदू सरोवराला भारताचे चरण अन्यथा भारताचा विस्तार अंगदेश (पाकिस्तान) वंगदेश (बांगलादेश) गांधार (अफगाणिस्तान) चीन, ब्रम्हदेश, तर्वसुदेश (तुर्कस्तान) नेपोदेश (नेपाळ) कबोंज (कजाकिस्तान) श्रीलंका, आर्यनदेश (अज्ञात) सिंहलद्विप (अंदमान- निकोबार) म्लेंच्छ देश (अरबस्तान) व सिंधुदेश (सिंध) इत्यादी देशांपर्यंत होता. अर्थातच प्रगत आणि सुविकसित झालेल्या आर्यांनी त्याकाळी साम्राज्य विस्तार केला होता, तरीही ऋग्वेदीक काळापासून आजच्या इतिहास युगापर्यंत प्राचीन मान्यता प्रचलित आहे की हिमालय हे भारतवर्ष हिदूस्थानाचे मस्तक,सिंधुदेश ही भारताची मान (मूर्ध्ना), उत्तर व मध्यप्रदेश भारताचे बाहू तर महाराष्ट्र

म्हणजे भारताचे उदर, दक्षिणपथ ही भारताची योनी अथवा सृजनस्थान, तर इंदुसरोवर भारताचे चरण आहेत. येथे असे आढळून येते की राष्ट्र भारत अथवा हिंदूस्थान हा शब्द पुल्लिंगी असला तरी त्याचे स्त्रियीकरण केले गेले आहे. उदा. भारत-भारती अथवा भारतमाता, राष्ट्र-राष्ट्री.

त्याप्रमाणे मनुष्याला समाजाची आवश्यकता पडली, त्याचप्रमाणे एकाच वंशाच्या, धर्म कर्माच्या व्यक्तींचा देश निर्माण करण्याची आवश्यकताही निर्माण झाली. आणि त्यानंतर साम्राज्यविस्तार, राजसूय यज्ञ, दिग्विजय, दिक्भ्रमण, युद्ध अथवा संघर्ष व द्वेष या कारणांनी राष्ट्रांमध्ये संघर्ष आरंभित झाला. म्हणून उत्तर वैदिक काळात व उपनिषद काळात ‘वसुधैव कुटुम्बकम्‘ ही संकल्पना जन्माला आली.

ऋग्वेद काळात शांती व ऐक्य महत्त्वाचे होते म्हणून 'हिंसा दूषयते हिन्दु:' ही संकल्पना जन्मली. मात्र यजुर्वेद काळात दस्युंची आक्रमणे वाढली, त्याकारणे 'हेतिभि शत्रुवर्ग सो हिन्दु:' ही संकल्पना जन्मली. शस्त्र व युध्दाचे महत्त्व विशद करणारी.

मात्र 'राष्ट्र' या संकल्पनेचे तसे नाही. राष्ट्र ही पूर्वीपासून आतापर्यंत चालत आलेली अतिप्राचीन व अपरिवर्तनीय संकल्पना आहे. धर्माप्रमाणे व त्याप्रमाणेही! ऋत ही संकल्पना आपण पाहूया, पण स्वतंत्रपणे.

तत्पूर्वी राष्ट्रोत्थान प्रार्थना विषयी आपण विवेचन पाहूया. ही राष्ट्रोत्थान प्रार्थना यजुर्वेदातील २९ व्या अध्यायातील २२ वा मंत्र म्हणून आढळते. ह्या

राष्ट्रोत्थान प्रार्थनेचे अजून एक वैशिष्ट्य आहे की स्त्रीला राष्ट्राचा आधार मानले आहे, म्हणूनच तिला सौभाग्यदायिनी, विजयिनी, अपराजिता व राष्ट्राकरिता 'प्राची (सकाळ) ठरवणारी म्हटले गेले आहे. (या प्रार्थनेत). याशिवाय दुसऱ्या कोणत्या देशाच्या उत्थानाच्या प्रार्थनेत न आढळणारी विशेषता म्हणजे निसर्गाचे वर्धन व्हावे आणि पशु-पक्ष्यांचे उत्तम संगोपन व्हावे, याखेरीज पर्जन्यमान सुव्यवस्थित राहो अशीही प्रार्थना या राष्ट्रोत्थान प्रार्थनेत केली गेली आहे.

एकूणच पाहता, ही प्रार्थना देशातील मनुष्यच नव्हे तर प्राणी, पशु, पक्षी, निसर्ग व पर्जन्यमान यांकरिताही केली गेली आहे.

ही प्रार्थना ऋषिका आदितीने अथवा कश्यपपुत्री काश्यपीने पितामह ब्रम्हाकडे केली आहे.

ही प्रार्थना पुढीलप्रमाणे:-

***ॐ आ ब्रम्हनम् ब्राम्हणो ब्रम्हवर्चसी जायतामाराष्ट्रे***

***राजन्य: शूरइषव्योतिव्याधी महारथो जायताम् द्रोग्धी***

***धनुर्वोढानंवानाशु: सप्ति: पुरन्धिर्योषा जिष्णू***

***रथेष्ठा: सभ्यो युवास्य यजमानस्य वीरो जायतां***

***निकामे-निकामे न: पर्जन्यो वर्षतु फलवत्यो***

***नओषधय: पचत्तां योगक्षेमो न: फलताम्***

अर्थ:- हे ब्रम्हन्! या स्वराष्ट्रामध्ये ब्राह्मण द्विज ब्रम्हतेजाने परिपूर्ण व्हावेत. क्षत्रिय हे महारथी आहेत, अरिदलांचा म्हणजे शत्रुदलांचा त्यांनी विनाश केलाच पाहिजे. गोमाता दुग्धमान व्हाव्यात म्हणजेच, माता या वीरमाता व्हाव्यात, त्यांनी आपल्या संततीला उत्तम,

उत्कृष्ट संस्कार देऊन संततीला धर्मरक्षक व राष्ट्रसंरक्षक बनवले पाहिजे.

पुढील ऋचेत असे म्हटले आहे की, पशु हे पुष्ट झाले पाहिजेत आणि अश्व हे वेगवान झाले पाहिजेत अन्यथा युद्धामध्ये रथाद्वारे व अश्वावर आरुढ होऊन युद्ध करता येणार नाही.

यापुढील ऋचेत स्त्री सक्षमीकरणाचे सूत्रच सांगितले आहे. 'जिला राष्ट्राचा आधार मानले जाते ती स्त्री सौभाग्यदायिनी, विजयिनी म्हणजेच अपराजिता तसेच तेजस्विनी ठरावी!' म्हणजेच ही अशी एकमेव राष्ट्रोत्थान प्रार्थना आहे, ज्यामध्ये राष्ट्राचा आधार'स्त्रीला'म्हटले गेले आहे.

याशिवाय बलवान यौध्दांनी सदैव नैतिक आचरण करावे, यजमानांचे पुत्र वीर ठरावेत. म्हणजे यजमानांनी यज्ञ करुन पुण्य अर्जित करावे व त्यातून जन्मलेल्या

पुत्रांनी धर्माचे रक्षण करावे. आमच्या इच्छेकरिता व कल्याणाकरिता पर्जन्य व ग्रीष्म ऋतुंचे उत्तम नियमन व्हावे.हा निसर्ग फळा-फुलांनी सदैव समृद्ध असावा. यातील अनेक वनस्पती औषधी म्हणून सिद्ध व्हाव्यात.

याखेरीज या प्रार्थनेत योगक्षेमकरी स्वतंत्रतेची संकल्पना ही मांडली गेली आहे, "आमची-आमच्या राष्ट्राची स्वतंत्रता ही योगक्षेमकारी व शाश्वत असावी, या स्वतंत्रतेचा योगक्षेम आमच्याकरवे उत्तम वाहिला जावा."

अध्यात्मदृष्टीने पाहिल्यास, राष्ट्र म्हणजे पूर्ण विश्व, पूर्ण ब्रम्हाडांचा पिन्ड असे मानल्यास हरकत नाही. किंबहुना मन, हदय म्हणजे राष्ट्र असेही रुपक उचित आहे.

हे परमप्रकृती, परमात्मा! ब्राह्मण म्हणजे विश्वाचे-शरीराचे ब्रम्हरंध म्हणजे महातारा, मस्तक, प्रज्ञा, बुध्दि व ज्ञान हे तेजाचे व शक्तीने परिपूर्ण व्हावेत. क्षत्रिय म्हणजे विश्वाचे बाहू, शरीराचे आज्ञाचक्र,अंतरीक्षाच्या तारका सामर्थ्यशाली व्हाव्यात. जेणेकरून कोणत्याही विपदेला तृतीय नेत्राने परास्त करता येईल, म्हणजेच ज्ञान व शक्तीने! याच आज्ञाचक्राने वासना-विकार, षडरिपुंना विनाश करता येईल. गोमाता म्हणजे हदय-सोमचक्र- जे करुणेने दुग्धमान तर प्रतिभेने मातृवान व्हावे. – सोमचक्रातून जगतकल्याणाकरिता प्रेरणा ठरणारे उत्तम विचार उत्पन्न व्हावेत. जगतातील सर्व जीव आणि त्यांची मने पुष्ट व सुष्ट व्हावेत.

याखेरीज जी संपूर्ण ब्रम्हांड, पिंड, शरीराचा व मनाचा आधार आहे, ती आदिमाया, योगिनी, कुंडलिनी तसेच मानिनी – ती तेजस्वी, अपराजिता, सौभाग्यदायिनी आहे.

याशिवाय मनाच्या बलवान प्रवृत्तींनी सत्प्रवृत्ती होण्याचा प्रयत्न करावा. मनातून उत्पन्न होणारी मोक्षाची इच्छा अधिक बलवती व्हावी, जेणेकरून साधकांच्या हातून सत्कर्मे घडावीत, धर्माचे रक्षण व्हावे. साधकांच्या कल्याणाकरिता त्या्च्या विकारांचे नियमन व्हावे. तसेच ही सृष्टी धर्म, सत्य, नीती, शस्त्र, शास्त्र व विवेकाने संपूर्ण असावी. याशिवाय या सृष्टीचे प्रत्येक अंग सात्त्विक ठरावे.

आणि सगळ्यात शेवटी, साधकांनी स्वतःचा योगक्षेम वाहावा इतके सामर्थ्य त्यांना प्राप्त व्हावे.

हे आहे राष्ट्रोत्थान, मनोत्थान आणि विश्वोत्थान प्रार्थना. मला वाटते, ही प्रार्थना पसायदानाप्रमाणे प्रत्येक विद्यालयात, महाविद्यालयात आणि विश्वविद्यालयात गायली गेली पाहिजे. कारण हा राष्ट्रभक्तीचाच एक भाग मुख्य आहे.

# स्त्री- यजुस मंत्र अथवा पुरन्ध्रि यजुस मंत्र

हा अत्यंत पवित्र व महान मंत्र आहे. नव्हे तर महामंत्र! हा मंत्र स्त्रीला उद्देशून म्हटलेला आहे, ह्या मंत्रात ऋषि स्त्रीला स्वतंत्रपणे यज्ञ करण्याची आज्ञा देताहेत. ऋग्वेदातही असा उल्लेख आहे की या करताना स्त्रीने व कन्येने आपल्या पतीसह-पित्यासह सामायिकरीतीने काही मंत्र म्हणावेत व काही आहुती प्रदान कराव्यात, मात्र त्यांनी (स्त्री व कन्येने) काही महत्त्वाच्या आहुती उदा. पुर्णाहुती, घृताहुती, सताहुती देत विशिष्ट वेदमंत्राचे उच्चारण करावे. याशिवाय काही विशिष्ट मंत्र आहेत की ज्याचे उच्चारण स्त्रियांनीच केले पाहिजे आणि काही विशिष्ट आहुती चे होत्रदान स्त्रियांनी व कन्यांनी केले पाहिजे.

ऋग्वेदाच्या अध्यायात आपण विश्ववरा, पांचाली, शची या अन्य विदुषींना यज्ञ करताना पाहिले आहे, त्यातल्या काही विदुषींनी स्वतंत्रपणे होत्रे केली आहेत. म्हणूनच प्रत्येक यज्ञात पत्नीची, कन्येची अथवा ऋषिका-पुरोहित स्त्रीची उपस्थिती असणे आवश्यक आहे. मात्र रजस्राव, व्याधी, प्रवास, स्नान, भोजन अथवा शयन अशा महत्वपूर्ण कार्याकारणे स्त्री यज्ञात उपस्थित नसल्यास यज्ञात तिची प्रतिमा अथवा सपत्नी यजमानासह आसनस्थ होते व यज्ञ पूर्ण करते. अपवाद वगळता महाभारतातील द्रुपदाच्या पुत्रकामेष्टी यज्ञाचा, त्या यज्ञात द्रौपदी व धृष्टद्युम्न अयोनिज जन्मणे हे विधिलिखित होते. त्याकारणे द्रुपदाची पत्नी-राणी पृषती मध्येच उठून अन्य कार्याकरिता गेली.

हा प्रसंग सोडता, प्रत्येक युगात स्त्रीची उपस्थिती (प्रत्यक्ष वा प्रतीकात्मक) महत्त्वपूर्ण मानली आहे, प्रत्येक धार्मिक कार्यात, श्राद्ध, दिपदान, पिंडदान, यज्ञ, जातकर्म, जन्म संस्कार, विवाह संस्कार इत्यादी.

त्याकारणे स्त्री-यजुस इत्यादी मंत्र निर्माण/उत्पन्न झाले असावेत.

स्त्री यजुस हा मंत्र यजुर्वेदाच्या १४ व्या अध्यायातील दुसरा मंत्र आहे. हा मंत्र पुढीलप्रमाणे:- (ह्या मंत्राच्या तीन ऋचा आहेत.)

***कुलयिनी घृतवती पुरन्धी: स्योने सीद सदने पृथिव्या:|***

***अभित्वा रुद्रा वसवो गुणान्विमा|***

***ब्रह्म पीपिही सौभागायाश्विनाध्दर्यू साद्यतामिहत्वा||***

१) या मंत्राचा असा अर्थ आहे की पहिली ऋचा पाहिल्यास, हे यजोमती स्त्री! तू कुलवती आहेस. तू अन्नामध्ये, भोजनामध्ये, यज्ञामध्ये,

होत्रामध्ये आणि विवाहामध्ये आहुती, स्वाद,हविष्य, सहभोजन घटक, प्रतिज्ञा आदि हेतूंकरिता घृतादि पौष्टिक पदार्थांचा तसेच हविष्य पदार्थांचा प्रयोग करणारी आहेस. तू तेजस्विनी असून बुध्दिमती आहेस. तू उत्तम सत्कर्मे करणारी आहेस, त्याकारणे तुझे जीवन या पृथ्वीवर संतोष जनक होईल.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास, हे आदिमाये! हे आदिशक्ती! तूच जीवनाचा, जगताचा, कर्माचा, साधनेचा यज्ञ करणारी आहेस. तूच या जीवनामध्ये, साधनेमध्ये, यज्ञामध्ये, ध्यानामध्ये आणि भक्तीमध्ये एकाच प्रकारची अनुभूती, विभिन्न प्रकारे देणारी आहेस, जेणेकरून आम्हाला जीवनाचा, साधनेचा,भक्तीचा, ज्ञानाचा त्याच

भक्तिचा विभिन्न रीतीने बोध होईल. तेज, बुध्दि, उत्तमता, सत्कर्मे, सत्य आणि संतोष या सर्व तुझ्या भुजा आहेत.

२) दुसऱ्या ऋचेचा अर्थ पाहता, हे यजोमती स्त्री! तू इतकी गुणवती, विदुषी, तेजस्विनी, कर्तव्यपरायणा आणि बुध्दिमती आहेस की रुद्र, वसु अशा देवताही साक्षात तुझेच स्तुती करतात.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास, हे आदिशक्ती! गुण, विद्वत्ता, तेज, कर्म, बुध्दि आदि तत्वांची तूच जननी आहेस, म्हणूनच त्रिदेवादि रुद्र, वसु इत्यादी देवताही तुझे पूजन करतात. याचाच अर्थ, या ऋचांमध्ये स्त्रीच्या सामर्थ्य, तेज, शक्ती, बुध्दि, सद्गुण आणि विद्वत्तेची पर्यायाने आदिशक्तीच्या अनेक रुपांची अथवा भुजांची स्तुती केली आहे. किंबहुना या सर्व क्षमतांचा महिमाच गायला आहे,

असे म्हटल्यास वावगं ठरणार नाही. म्हणूनच मी हा मंत्र निवडला होता.

३) तिसरी ऋचा पाहिल्यास याचा अर्थ असा आहे की, सौभाग्य प्राप्तीसाठी म्हणजेच उत्तम भाग्य प्राप्त करण्यासाठी तू या वेदमंत्रांच्या अमृताचे वारंवार पान करावेस. तू ब्रम्हचर्याश्रमात असताना विविध विदुषी व विद्वानांकडून विभिन्न ज्ञान-विद्या, शास्त्रे, शस्त्रे अर्जित करावेस आणि तू उच्चस्थितीवर प्रतिष्ठित व्हावे.

या ऋचेमध्ये वेदमंत्रांना 'अमृत' म्हटले गेले आहे, कारण त्यात 'प्रणव ॐ' आहे. हा अजरामर आहे. याशिवाय ऋषिची, बुध्दि आणि दैवी स्फुरणाच्या मंथनातून वेदमंत्र उत्पन्न झालेले आहेत.

या ऋचेमध्ये ब्रम्हचर्याश्रम, विद्यार्थ्यांचं, शास्त्र अध्ययन तसेच शस्त्रविद्याच्या शिक्षणाचे महत्त्व विशद केले आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, साधकांनी उत्तम अनुभूती तसेच परमानंद प्राप्त करण्यासाठी साधना करावी, वेदमंत्रांचे अनुसरण करावे. साधकांनी ब्रम्हचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास अशा चारही आश्रमातील कर्तव्याचे पालन करावे. त्यांनी शस्त्र- शास्त्र, ज्ञान-विद्या अधिकाधिक अर्जित कराव्यात.

या श्लोकामध्ये, ऋचांमध्ये स्त्रीच्या अस्तित्त्वाचे महत्त्व प्रस्तृत केले आहे. याखेरीज या ऋचांमध्ये, मंत्रांमध्ये स्त्री सक्षमीकरण तसेच स्त्रीचे विद्याग्रहण, शस्त्र शिक्षण तथा यजोमानीयतेची आवश्यकता देखील स्पष्ट केली आहे. यदि स्त्री सक्षम असेल तर समाजाचे रक्षण होते. यदि स्त्री शिक्षित असेल तर ती समाजाला घडवू शकते. यदि स्त्री यजोमती

असेल तर तिच्याद्वारे उच्चारल्या जाणाऱ्या वेदमंत्रांमुळे संपूर्ण समाज तसेच कुटुंबाचे वातावरण शुद्ध तसेच पवित्र होऊ शकते. कारण स्त्रीच धात्री, धरित्री, समाजाला संस्कार देणारी तसेच यजमानासह अथवा यजमानाशिवाय स्वतंत्रपणे यज्ञ करणारी यजोमतीही असते

## *गायत्रीमंत्र*

गायत्रीमंत्र हा कोणाला ज्ञात नाही? हा मंत्र सर्वांनाच ज्ञात आहे. हा मंत्र शाळांमध्येही शिकवला जातो, इतकेच नव्हे तर ध्यान, गुरुकुले अथवा शिबिरांमध्येही यांचे उच्चारण होते. याखेरीज विद्यार्थ्यांनी हा मंत्र म्हणावा, जेणेकरून विद्यार्थ्यांची एकाग्रता आणि ज्ञान ग्रहणाची क्षमताही वाढेल, असे शिक्षक-शिक्षिका सांगतात. याशिवाय सूर्याला अर्ध्य देताना, सूर्यवंदना किंवा प्रभात वंदना करताना, सरस्वती पूजन करताना, अध्ययन करताना तसेच यज्ञ व होत्राच्या समयीही गायत्री मंत्राचे उच्चारण व पठण केले जाते. हा गायत्री मंत्र एकूण २४ अशा दिव्य अक्षरांपासून निर्माण झालेला आहे.

गायत्री मंत्र हा यजुर्वेदातील चार मूलाक्षरे आणि ऋग्वेदातील तिसऱ्या मडंलातील ३२ व्या मंत्रातील १० व्या

छंदातील २० अक्षरांपासून निर्माण झाला आहे. गायत्री मंत्र ॐ ॐ ॐ प्रणव, अनाशवंत, अनंत, नित्य, शाश्वत व आदिस्वराप्रमाणेच महान व पवित्र मानला जातो. गायत्री मंत्राचे स्फुट व स्पष्ट उच्चारण सहप्रार्थना, सरस्वती वंदन आणि होत्र-यज्ञावेळी होते. तर या मंत्राचा मानसिक रुपाने जप, सूर्यवंदना, अर्ध्य, नामस्मरण इत्यादी मध्ये केला जातो.

हा मंत्र यजुर्वेदातील तिसऱ्या अध्यायातील ३५ ऋचेमध्ये व मंत्रामध्ये २२ व्या अध्यायातील ९व्या ऋचेमध्ये, ३० व्या अध्यायातील दुसऱ्या ऋचेमध्ये आणि १६ व्या अध्यायातील तिसऱ्या ऋचेमध्ये आढळतो. याशिवाय सामवेदातील १४६२व्या ऋचेमध्येही हा जगप्रसिद्ध मंत्र आढळतो.

ह्या गायत्री मंत्राची ऋषिका स्वयं गायत्री देवी आहे. ह्या गायत्री देवतेला ‘सवितादेवी’ असेही संबोधले जाते. ‘सवितृ’ देवी अथवा गायत्री देवतेचा संबंध सूर्य, प्रकाश, तेज, सूर्य मंडल, तेजोमंडल, अंतरीक्ष, शाश्वत ज्ञानाशी जोडला जातो. याशिवाय ही गायत्री देवता ब्रम्हदेवाची प्रथम पत्नी सुध्दा मानली जाते. असे म्हटले जाते, ज्याक्षणी गायत्री देवता अथवा सवितृ देवतेचा ब्रम्हदेवाशी वाद-प्रतिवाद झाला, त्याकारणे गायत्री देवतेने क्रोधाने पतिच्या गृहाचा त्याग केला. ब्रम्हदेवाचे गृह म्हणजे साक्षात सृष्टी! सृष्टीतून गायत्री देवतेने गमन केले म्हणजे साक्षात तेज, ज्ञान, शाश्वत ज्ञान, प्रकाश आणि सूर्यच निघून गेला. त्याकारणे ब्रम्हदेवाने ज्ञान व तेजाच्या वर्धण्याकरिता यज्ञ करण्यास प्रारंभ केला. मात्र पत्नी समवेत नसल्याकारणे यज्ञ करता येईना, म्हणूनच देवतांनी ब्रम्हदेवाचा द्वितीय विवाह ज्ञानी व बुध्दिमती सुगोप कन्या ‘शारदा’ अथवा ‘सरस्वतीशी’ संपन्न करवून यज्ञास प्रारंभ केला. हे पाहून गायत्री क्रुद्ध

झाली, तिच्या क्रोधाकारणे त्रिभुवन जळू लागले. तत्क्षणी कुमारी षोडषी त्रिपुरसुंदरीने तिचा क्रोध शांत केला आणि देवी गायत्रीने ब्रम्हदेव आणि सरस्वतीसह यज्ञ संपन्न केला.

ही कथा अत्यंत रोचक आणि बोधदायक आहे. मात्र या कथेतून एक विशेष बाब मी नमूद करत आहे की स्त्रियांना आपल्या पतीचा क्रोध आल्यास अथवा पतीशी वाद-प्रतिवाद झाल्यास त्याकाळीही स्त्रियांना पतीगृहाचा त्याग करून मातृगृही अन्यथा अन्यत्र प्रयाण करण्याचा अधिकार व स्वातंत्र्य होते. जसे की देवी लक्ष्मीला विष्णूने केलेली उपेक्षा सहन झाली नाही म्हणून तिने विष्णू लोकातून प्रस्थान केले होते. आपण घातलेल्या अटीचा भंग झाल्याने अप्सरा उर्वशी व महानदी देवी गंगेने आपल्या पतीचा थेट त्याग केला होता. इंद्राने शचीच्या सामर्थ्याचा उपहास केल्याने तिने इंद्रलोकाचा त्याग केला होता.

हे सर्व वगळता मुख्य विषयाकडे वळू. गायत्री मंत्राची देवता परमप्रकृती व परमात्मा आहे. ह्या मंत्राचा छंद गायत्री अनुष्टप असून २४ अक्षरांमध्ये २४ देवतांची शक्ती सामावलेली आहे. याखेरीज या २४ अक्षरांना २४ ऋषि, २४ ऋषिका- गायत्री, आदिती, वागाम्भृणी,शची, विश्ववरा, सरमा, सार्पराज्ञी, श्रध्दा कामायनी, रात्री, काश्यपी,शाश्वती, त्रिशिरा, उर्वशी, रोमेशा,सूर्या, घोषा, इन्द्रमातर, अपाला, जुहु, दक्षिणा, सिकता-निवावरी, लोपामुद्रा, गोधा आणि इन्द्राणी. २४ बीज तत्त्वे जसे की ॐ, क्लीं, हीं, श्री, हुं, जुं आदि, २४ देवतांशी जसे की सविता, स्वाहा, शची, स्वधा, द्रोधी, मंगला व काली आदि, २४ सिध्दींशी- जसे की अणिमा, गरिमा, लघिमा, महिमा आदि, २४ तत्त्वांशी- धर्म, सत्य, अस्तेय, सात्त्विक क्रोध, धारण, समाधी, क्षमा, शांती, धृति, मेधा, शुचिता, संयम, बुध्दि आदि, २४ रंगाशी जोडले जाते.

याशिवाय गायत्री मंत्राच्या या २४ अक्षरांची रचना वैज्ञानिक रीतीने झाली आहे. कारण गायत्री मंत्राच्या प्रत्येक अक्षराने प्रतिक्षण ११०,००० पवित्र व सकारात्मक स्पंदने निर्माण होतात. त्या स्पंदनाचा श्वासाद्वारे आपल्या शरीरात संचार होतो व त्याकारणे अनेक रोगांचे, भयाचे, पीडेचे, दुःखाचे, दुविधेचे व चिंतेचे निवारण होते. गायत्री मंत्राच्या जपामध्ये साधकांच्या अंतर्वेदनेमध्ये असलेल्या प्रसुप्त शक्तीवर आघात होतो व त्या शक्ती जागृत होतात. चेतनेचा अनुनूत प्रवाह शरीराच्या रोमारोमांत वाहू लागतो व त्याकारणेच आत्मज्ञान व ब्रम्हज्ञान प्राप्त होते.

हा मंत्र अन्य वेदमंत्राप्रमाणेच सर्वश्रेष्ठ मानला जातो. कारण या मंत्रामध्ये कोणत्याही वस्तूची कामना केली नाही. याउलट या मंत्रामध्ये बुध्दि, मन, आत्मा, देह, भावना व

प्रेरणा या वासनारहित, शुद्ध, निर्मल तसेच पवित्र होण्याकरिता प्रार्थना केली जाते, तीही स्वतः करिताच नव्हे तर सर्वांकरिता!

हा मंत्र पुढीलप्रमाणे:-

***ॐ भुर्भव स्व: तत्सवितुर्वरेण्यम् भर्गोदेवस्य धीमहि धियो यो न: प्रचोदयात्***

हा मंत्र स्वयं रुपात आध्यात्मिक स्तरावरचा सर्वोच्च असा मंत्र आहे. त्याकारणे मी या मंत्राच्या अर्थाच्या स्पष्टीकरणात 'अध्यात्म दृष्टीने पाहता' असे लिहिणार नाही. या मंत्राचा अर्थ पाहता, असे वाटते की ही प्रार्थना अथवा मंत्र अनेक साधक-साधिका करताहेत. या मंत्राचा अर्थ असा आहे की आम्ही सर्व साधक-साधिका त्या महान परमात्मा व परमप्रकृतीचे ध्यान करतो आहोत, जे जे उभयंता वैभव, संपत्ती, कीर्ती, तेज, सामर्थ्य व शक्तीने युक्त आहेत, ज्या

उभयंतांनी भूलोक, अंतरिक्ष, नरक, नागलोक व यक्षलोक या लोकांना उत्पन्न केले आहे, त्या सृष्टीकर्त्या, पाप व दुःखाचे निवारण करण्याचा, प्राणदायक, सुखस्वरुप, सूर्याप्रमाणे-सवितेप्रमाणे उज्वल वरण्यायोग्य (धारण करण्यायोग्य अथवा सेवा करणाऱ्या योग्य) परमात्मा व परमप्रकृतीला आम्ही जप,होम, नामस्मरण,यज्ञ, संन्यास व ध्यान, ज्ञान व अतिथीसेवेमध्ये धारण करतो आहोत. हे परमप्रकृती व परमात्मा! आमच्या बुध्दि, मन, आत्मा, देह, भावना व प्रेरणांना पवित्र कर आणि त्यांना सन्मार्गाला लाव. त्यांच्याकडून सत्कर्म घडेल असे कर.

ह्या मंत्राचे उच्चारण (मौनावस्थेत) ब्रम्ह मुहूर्तावर भावनिक रुपाने जप केल्याने मनुष्याला आपल्या समस्यांचे समाधान प्राप्त होऊ लागते अर्थातच ते समाधान मस्तकात उमटू लागते. याशिवाय असेही म्हटले जाते की गायत्री

मंत्राचा नित्य जप केल्यास त्वचेमध्ये अदभूत तेज येते, नेत्राची दृष्टीशक्ती वाढते. क्रोधी व्यक्तीचा क्रोध सात्विक होतो व त्याचे मन/ चित्त स्थिर राहते. याखेरीज गायत्री ही त्रिपदा देवता मानली जाते. तिच्यापासून ॐ हा प्रणव आदिस्वर, क्लीं, ह्रीं या बीजत्रयी उत्पन्न झालेल्या आहेत. ॐ म्हणजे अनाहत स्वर आदिशक्तीचे प्रतिक. क्लीं महाकालीचे प्रतिक, ह्रीं म्हणजे सरस्वतीचे रुप.

म्हणजेच गायत्री देवी त्रिविध तापांपासून मुक्ती देणारीही आहे.

# उत्तिष्ठत जागृत वरान्निबोधत श्लोक/मंत्र

हा मंत्र श्लोक यजुर्वेद आणि उपनिषदांमध्येही आढळतो. हा मंत्र अथवा श्लोक मला अत्याधिक प्रिय आहे. याशिवाय या काळात आवश्यकही आहे, विशेषतः हिंदूंसाठी. कारण हिंदूवर आजकाल अन्याय व अत्याचार वाढत चाललेत. याशिवाय हिंदू धर्मावर संकट येत चालले आहे. स्वतःचेच राम मंदिर बांधण्यासाठी हिंदूंना वर्षानुवर्षे संघर्ष करावा लागला. मात्र तरीही देवळांची विटंबना, मंदिरे तोडणे, स्तोत्र पाठ करण्यापासून रोखणे असा आपल्या देवाधर्माचा अपमान थांबला नाही. म्हणुनच हिंदूनी जागृत व्हायचं आहे व तोपर्यंत थांबायचे नाही जोपर्यंत आपला हिंदूधर्म पूर्णतः व पुनश्च सुरक्षित सन्मानजनित, कीर्तीमंडित व  उच्च स्थानित होत नाही.

याखेरीज हा मंत्र व श्लोक स्वामी विवेकानंदांनाही प्रिय होता म्हणून ते सदैव हाच श्लोक युवकांना सांगत असत.

हा मंत्र, श्लोक कृष्ण यजुर्वेदामध्ये व त्याच्यापासून उत्पन्न कठोपनिषदामध्ये आढळतो. हा श्लोक १४ व्या अध्यायातील १४ वा मंत्र असावा, कठोपनिषदातील अथवा कृष्ण यजुर्वेदातील. ह्या श्लोकाला अथवा मंत्राला 'मन जाग्रण' व 'आत्मजाग्रण' मंत्र किंवा श्लोकही मानले जाते. जसे कृष्णाने अर्जुनाला युद्धामध्ये त्याने शस्त्रे टाकली असता त्याला भगवदगीता सांगून त्याला पुनरोत्थानाकरिता प्रवृत्त केले होते. त्याप्रमाणेच ह्या मंत्र/ श्लोकाद्वारे हिंदू युवकांना पुनरोत्थानाकरिता प्रवृत्त केले जाते. खरंतर हा मंत्र/ श्लोक इतका दिव्य व अदभूत आहे की म्हणताक्षणी जाणवते की आपल्याला अधिक तेज, सामर्थ्य, बल, शक्ती आणि ज्ञानाची प्राप्ती होत आहे, आपली जागृती होत आहे.

आपल्या मनाचे, आत्माचे, विवेकाचे, बुध्दीचे व मेधेचे जागरण होत आहे. मला वाटते, आपण हा श्लोक वारंवार म्हटल्यास अथवा स्वतःला दुसऱ्याला उद्देशून म्हटल्यास आपले मस्तिष्क जागृत होते. हा माझा स्वतःचा असा सुंदर, अदभूत व दिव्य अनुभव आहे  याखेरीज वैज्ञानिक व संशोधकांचे असे मत आहे की हा मंत्र म्हटल्यास मेंदूतील पेशी, स्मरणे व स्पंदनाचा धक्का बसतो व त्या जागृत होतात.

तो श्लोक पुढीलप्रमाणे:-

***उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत|***

***क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया दुर्गमपथस्तकवयो वदन्ति||***

याचा अर्थ असा आहे की हे मनुष्यहो! उठा, जागृत व्हा, तोपर्यंत (आणि) थांबू नका, जोपर्यंत तुम्हाला धर्म, सत्य, नीती, आत्मा, परमात्मा व संपूर्ण विश्वाचे ज्ञान होत नाही व तुम्ही सर्वजण धर्म, सत्य, नीती, आत्मसंयम व धैर्याचे पालन-आचरण करत नाही. तुम्ही याकरिताच श्रेष्ठ व ज्ञानी, विदुषी व विद्वानांकडून ज्ञान प्राप्त करा. मात्र हा धर्म ज्ञान-आत्मज्ञानाचा मार्ग व त्याच्या आचरणाचा मार्गही गहन, कठीण, विपदा व दुविधांनी भरलेला आहे. म्हणूनच त्रिकालदर्शी ज्ञानीजण म्हणतात, धर्म व सत्य ह्या ज्ञानाच्या मार्गाने चालणे अत्यंत कठीण आहे. त्यासाठी तलवारीप्रमाणे धारदार इच्छा शक्ती व तीक्ष्ण उर्जेची आवश्यकता आहे, जी विपदांना छाटू शकते.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास, हे साधक हो-साधिकाहो! उठा, जागृत व्हा, तोपर्यंत थांबू नका जोपर्यंत तुम्हाला

आत्मस्वरूपाचे ज्ञान होत नाही व सायुज्यमुक्ती प्राप्त होत नाही. मात्र साधना, आध्यात्मिक यात्रेचा, भक्तीचा अथवा हिंदू धर्मरक्षणासाठी ईश्वर लीनतेचा मार्ग अत्यंत गहन, कठीण, विपदा व दुविधांनी, संघर्षांनी भरलेला असतो. म्हणूनच ऋषिका व ऋषि म्हणतात, ह्या अध्यात्माच्या मार्गाने चालणे अत्यंत कठीण असते. त्यासाठी तलवारीप्रमाणे धारदार इच्छा शक्ती, मानसिक ऊर्जा, सद्सदविवेक बुध्दी व धैर्याची आवश्यकता आहे, जी दुविधा, संघर्ष, विकार आणि विपदांना छाटू शकते.

## *भोजन मंत्र*

‘अन्न हे पूर्ण ब्रह्म| जाणिजे यज्ञकर्म|' ही आपली भारतीय हिंदू संस्कृती आहे. अन्नाला साक्षात ब्रम्हाची उपमा दिली आहे. अन्न अथवा भोजन पोटात गेल्याशिवाय आपल्याला तत्त्वज्ञान, धर्म, सत्य, नैतिकता, कार्यकारणभाव व जीवनमूल्ये मनुष्याला पचत नाही. भोजन जर प्राप्त झाले नाही आपली कुठलीही क्षुधा अपूर्ण राहिली तर मनुष्य पशुपेक्षाही नीच होतो. या हाताएवढ्या पोटासाठी थेट मारामारी ही होते, काही काही वेळा हिंसाही घडते. म्हणूनच अन्न ही मानवाची मूलभूत गरज मानली जाते. जरी उपवास ठेवायचा विचार केला तर आपल्या उदराची दुंदुभी वाजून नकारही देतेच.

भोजन मंत्र भोजन करण्यापूर्वी म्हणणे आवश्यक आहे, जेणेकरून आपल्या मनात भोजनाप्रति सदैव कृतज्ञता, सन्मान, मान, भक्ती, श्रध्दा व दिव्यता निर्माण व्हावी. भारतीय सनातनी हिंदू संस्कृतीत अनेक भोजन मंत्र आहेत. जसे की ‘वदनी कवळ घेता नाम घ्या श्री हरीचे, सहज हवन होते नाम घेता मुखाने' हा भोजन मंत्र, तर हिंदीमध्ये हे भगवान! ‘यह भोजन सभी को प्राप्त हो एवं सभी देवताओं को समर्पित भी हो’असाही भोजन मंत्र आहे. मात्र तीन मुख्य मंत्र हे भोजन मंत्र मानले जातात. यजुर्वेद, भगवदगीता व कठोपनिषदामध्ये हे भोजन मंत्र आढळतात.

हा भोजन मंत्र यजुर्वेदातील ११ व्या अध्यायातील ८३ वा श्लोक आहे. ह्या मंत्रालाही आध्यात्मिक पार्श्वभूमी आहे. याची कुणालाही कल्पना नसेल. अन्नाला देवता म्हणून मानले जाते. याखेरीज आपली भारतीय हिंदू वैदिक संस्कृती इतकी महान आहे की जठराग्निलाही अग्नि नारायणाचे

रुपच म्हटले जाते. यात काही शंका नाही, की अन्नाभाव व निद्राभावाकारणे शरीरातील पित्त व कृष्ण पित्ताचे प्रमाण अधिक होते किंवा घटते. ते पित्त/ कृष्ण पित्त हे शरीरातील अग्नितत्त्वाची द्रव्ये आहेत. ज्याप्रमाणे वात हे वायुतत्त्वाचे द्रव्य, कफ हे आपतत्त्वाचे द्रव्य असते, त्याचप्रमाणे कृष्ण पित्त व पित्त ही अग्नितत्त्वाची द्रव्ये असतात. यदि या चारही द्रव्यामध्ये संतुलन राहिले नाही, तर शरीराचा समतोल ढासळतो व मनुष्य आजारी पडतो.

हा भोजन मंत्र पुढीलप्रमाणे:-

***अन्नपतेन्नस्य नो देहयनमीवस्यं शुष्मिण:।***

***प्रपं दातारन्तरिषऊर्जन्नो धेहि द्विपदे चतुष्पदे॥***

***ॐ शान्तिः  शान्तिः शान्तिः॥***

या श्लोकाचा असा आहे की हे परममाते! परमप्रकृती आणि परमात्मा! परमपित्या! हे विविध प्रकारच्या अन्न पदार्थांची धात्री व दात्या! आपण कृपया आम्हा सर्वांना

नविन प्रकारची पक्वान्ने अथवा भोजन पदार्थ प्रदान करावी. रोगरहित असलेले व पुष्टिकारक असलेले अन्न आम्हाला देऊन ओज, तेज, सामर्थ्य,बल, शक्ती व आरोग्य प्रदान करावे! हे अन्नदात्री व मंगलकर्ती! हेही कार्य करावेस की द्विपाद व चतुष्पाद प्राणीमात्रांनाही उत्तम भोजनाची प्राप्ती करावी व सर्वांनाही सुख-शांती प्रदान करावी.

अध्यात्म दृष्टीने पाहता, हे परममाता असलेली आदिशक्ती आणि परमपित्या असलेला परमात्मा! हे विविध प्रकारच्या विद्या शक्तीच्या धात्री व दात्या! कृपया आपण आम्हां साधकांना (विविध प्रकारचे ज्ञान, बुध्दी व मेधा) प्रदान करावे. आम्हां सर्वांना असे ज्ञान, बुध्दी, मेधा, विद्या, उत्तम अनुभूती प्रदान करावे, ज्यामध्ये विकार, क्लेश, दुःख, पीडा नसेल व जे साधकांच्या उन्नती अथवा आध्यात्मिक, सामाजिक, मानसिक व नैतिक प्रगतीला पुष्टीदायक ठरावेत.

याखेरीज आम्हां साधकांना ओज, तेज, सामर्थ्य, बल, शक्ती व अनुभूती प्रदान करावे. याखेरीज हे परमप्रकृती व परमात्मा! त्या सर्वमानवेतर प्राण्यांनाही ज्ञान प्रदान कर, जे ज्ञान प्राप्त करण्यासाठी उत्सुक आहेत व सर्वांना मनशक्ती प्रदान करावी व सुखही. म्हणजेच आपला हिंदू धर्म, हिंदू संस्कृती खूप महान आहे की जेथे (इतर पाश्चिमात्य संस्कृतीत) टीव्ही शोमध्ये अन्न फेकून देताना दाखवितात तसेच अन्न तुडवताना दाखवतात इतकेच नव्हे तर जेवण कचऱ्याच्या डब्यात फेकतानाही दाखवितात. डस्ट करण्याची वस्तू म्हणजे जेवण! पाश्चात्य सहजपणे प्लेट फेकून देतात, अन्न जमिनीवर टाकतात व त्यावर चालूनही जातात, हे पाश्चात्य शोमध्ये, पिक्चर्स व सिरीयलमध्येही सहज दाखविले जाते. म्हणजे भोजन जे आपल्याला शक्ती, उर्जा देणारे असते, तरीही त्याची उपेक्षा करावी, हेच त्या शोमध्ये दाखविले जाते.

मात्र आपला हिंदू धर्म व संस्कृती इतकी महान आहे की धर्म व्यक्तीलाच नव्हे तर पशुंना, पक्ष्यांना, प्राण्यांनाही, निसर्गाला व भोजनालाही देवता समान/परमेश्वरासमान मानले जाते.

म्हणूनच आपल्या धर्माला व संस्कृतीला तुच्छ लेखू नका.

## तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु श्लोक/यजुस

हा श्लोक अप्रत्यक्ष सद्वस्तूमीमांसा, अतिद्रिंय सत्ता, मनाचे आंतरिक विश्व व आत्मा- परमात्माविषयी खूप काही सांगून जाणारा आहे. हया श्लोकाला 'यजुस' असेही म्हटले जाते. कारण हाही श्लोक यजुर्वेदात आढळतो. यजुर्वेदामध्ये याकरिता दोन यजुस मंत्र आढळतात, तसेच या श्लोकाची पहिली ऋचा ऋग्वेदातही आढळते. यातील दोन्ही यजुषांचे वेगवेगळ्या प्रकाराने अर्थाचे स्पष्टीकरण वेगळे वेगळे मी केले आहे. त्याकारणे मी आध्यात्मिक दृष्टीने पाहता असेही लिहिण्याची आवश्यकता नाही. कारण हे यजुषही स्वयं आध्यात्मिक आहेत.

यातील प्रथम व द्वितीय श्लोक शुक्ल यजुर्वेदामध्ये व त्याच्या ३४ व्या अध्यायामध्ये प्रारंभीच उल्लेख आहे. म्हणजेच पाचव्या अथवा सहाव्या यजुषामध्ये हे दोन्ही

श्लोक आढळतात. ह्यातील प्रथम मंत्राचा आशय जाणून आपण इतके धन्य होऊ की आपल्या धर्माची संस्कृती, वाड्मय किती महान व वैज्ञानिक पायांवर रचलेली आहे म्हणजेच या प्रथम मंत्रामध्ये अथवा यजुषामध्ये मनाचे मानसशास्त्रीय निकष तसेच कर्मयागांचा नूतन सिध्दांत अलंकृतरीत्या प्रगट केले आहेत. याशिवाय हिंदू धर्माचे मूळ असलेल्या  यज्ञव्यवस्थेचा पुरस्कार करत मनाला यज्ञाची उपमा दिली आहे.

***येन कर्माण्यपसो मनीषिणोयज्ञो कृण्वन्ति विदथेषु धीरा:|***

***प्रजानाम् तन्मे मन: शिवसंकल्पमस्तु||***

या मंत्राचा असा अर्थ आहे की मनाद्वारे यज्ञामध्ये यज्ञाच्या क्रियाविधीच्या ज्ञानाच्या साहाय्याने कर्मशील, धैर्यवान असलेले मनीषीजन (यजमान) कर्मांना ग्रहण व

धारण करतात, कृत करतात. जी कर्मे विचार, भावना व प्रेरणा शुभ, इष्ट, अपूर्व व नैतिक असतात. जी कर्मे विचार, भावना व प्रेरणा यज्ञकार्याप्रमाणे सक्षम व सशक्त असतात आणि जी कर्मे मानवाच्या अंतरंगामध्ये व पुण्याईमध्ये स्थित असतात. अशी कर्मे, विचार, भावना व प्रेरणा माझ्या मनाद्वारे घडावीत, तसेच माझे मन शांत, शुभ, धर्मशील, सत्यवान, कल्याणप्रद व जनहितकारक विचारांचे व्हावे,हे ईश्वरा! हीच माझी तुझ्याकडे प्रार्थना आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहता, मनाद्वारे यज्ञामध्ये म्हणजेच कर्मयोगामध्ये कर्माच्या हेतूंच्या उद्दिष्टाविषयी ज्ञानाच्या साहाय्याने कर्म धैर्यशील असलेले कर्मयोगी कर्मांना ग्रहण व धारण करतात. जी कर्मे विचार, भावना व प्रेरणा मानवाच्या अंतरंगामध्ये अपूर्व असतात.अपूर्व म्हणजे जे श्रेष्ठ असून भौतिक नाही, ते आत्मिक आहे. याखेरीज माझ्या

आत्माने शुभ, धर्मशील सत्यवान, कल्याणदायक व जनहितकारकच विचारांचे संवहन करावे, हे ईश्वरा। हीच प्रार्थना माझी तुझ्याकडे आहे.

***यत्प्रज्ञानमुत चेतो धृतिश्च यज्जोतिरन्तमृतम् प्रजासु|***
***यस्मान्न ऋते किंच न कर्म क्रियते तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु||***

या यजुषाचा अर्थ असा आहे की जो *मनुष्यामध्ये* प्रज्ञा म्हणजे सखोल ग्रहणक्षमता व निर्णयात्मक सामर्थ्याच्या, ज्ञानाच्या, चेतना व धैर्य रुपामध्ये अवस्थित आहे अथवा ही प्रज्ञा गहनता, निर्णय क्षमता, सामर्थ्य, चेतना, धैर्य व ज्ञानाचा आधार आहे. मनुष्याच्या अंतरंगामध्ये अमृत जे अजरामर आहे. सत्ता व ज्योति रुपाने विद्यमान राहत आहे व ज्याच्या अभावाकारणे कोणीही कर्म करु शकत नाही, ते माझे मन

शांत, शुभ व कल्याण प्रद विचारांनी भरावे. प्रज्ञा व मनाला ज्योतिर्मय म्हटले जाते. कारण इंद्रियांद्वारे जे बाह्य ज्ञान प्राप्त होते. त्या ज्ञानाचे परीक्षण प्रज्ञा व मनाद्वारे केली जाते, तेच मन व प्रज्ञा त्या ज्ञानाला प्रकाशित करते, ग्रहण करते. तेच मन व प्रज्ञाही आहे, ज्याद्वारे कर्मेंद्रिये कर्म करण्यासाठी प्रेरीत होतात. मानव शरीराची सक्रियतेचे कारण मन व प्रज्ञाच असते.

## ***सत्य विधान यजुष***

मी या विभागात दोन सत्य विधान यजुष लिहिणार आहे. सत्य विधान यजुष म्हणजे जे सत्याची महती कथन करतात, असे यजुष. हे दोन्ही यजुष अत्यंत महत ज्ञानाने व आशयाने परिपूर्ण आहेत. याशिवाय या मंत्राचा विस्तार लहान असला तरी पहिला मंत्र फक्त ३ (तीन) शब्दांचा व ८ (आठ) अक्षराचा आहे, तर दुसरा मंत्र ४ (चार) शब्दाचा व ११ (अकरा) अक्षरांचा आहे. तरीही या दोन्ही मंत्रांतून अत्यंत महान तत्त्वज्ञान विशद होते. या दोन्ही मंत्राचा प्रयोग आहुती देण्यासमयी केला जातो व सत्याची महती कथित करण्यासाठीही. हे उभय मंत्र शुक्ल यजुर्वेदातील आहेत. याशिवाय हे मंत्र यजुर्वेदातील सत्य विधान यजुष म्हणून जाणले जातात.

त्यातील प्रथम मंत्र पुढीलप्रमाणे:-

***सत्येनो त्रमिता भूमि:||***

या यजुषाचा अर्थ असा आहे की सत्याने या भूमिचे त्रायन केले आहे. सत्याकारणेच, पुण्याकारणे, धर्माकारणे, नीतीकारणे, सज्जनाकारणे व सदाचारी स्त्रियांकारणे ही भूमि, पृथ्वी, हे राष्ट्र, हे ब्रम्हांड, हे अंतरिक्ष व हे अनंत लोक टिकून आहे. त्यांचे अस्तित्व अबाधित राहिले आहे. ह्या यजुषाला किती महान अर्थ आहे. आध्यात्मिक, देशिक, ऐहिक, अतीद्रिंय, सार्वत्रिक, नैतिक, आधिदैविक,भौतिक प्रकारचा अर्थ आहे या यजुषाला.

तसे आध्यात्मिक दृष्टीने पाहता, सत्याकारणेच माझ्या धर्माचे, माझ्या आत्म्याचे, माझ्या नीतीमत्ताचे, भावना व प्रेरणा, माझ्या मनाचे, माझ्या कर्माचे तसेच या ब्रम्हांडाचेही त्रायन घडत आहे. माझ्या म्हणजेच साधकाच्या सत्य, धर्म, पुण्य, नीती, सदाचार व परमात्म्याकारणे प्रत्येकाचे अस्तित्व टिकून राहिले आहे.

द्वितीय मंत्र पुढीलप्रमाणे:-

***<u>अहमा्नृतात सत्यमुपैति||</u>***

या यजुषाचा अर्थ असा आहे की यजुष एका प्रकारची प्रार्थना आहे की हे परमप्रकृती व आदिशक्ती तसेच हे परमपित्या! मी असत्याकडून सत्याकडे चलावे. माझे मन, आत्मा, नीतीतत्वे, भावना, प्रेरणा, कर्म ही असत्याकडून सत्याकडे प्रवाहित व्हावीत म्हणजेच अशुद्धातून शुध्दाकडे, असत्याकडून सत्याकडे, मृतत्वाकडून अमृत्वाकडे. ही एका प्रकारे ‘तमसो मा ज्योतिर्गमय’ चीच पूर्वसंकल्पना आहे. ज्याप्रमाणे बृहदारण्यकम् उपनिषदामध्ये ‘तमसो मा ज्योतिर्गमय’ हा पवमान मंत्र आहे, त्याचप्रमाणे या यजुषाला मी ‘पूर्व पवमान मंत्र' उल्लेखिला आहे. हा मंत्र

किंवा यजुष मूलतः च आध्यात्मिक आहे. त्याकारणे मी आध्यात्मिक दृष्टीने असे लिहिणार नाही.

सत्यविधान यजुष हे खरोखरच महान मंत्र आहेत. एकाप्रमाणे पवमान मंत्रही आहेत. पवमान म्हणजे महान, ज्ञान पूर्ण, आशयपूर्ण मंत्र होय. फक्त तीन शब्द अथवा चार शब्दामध्ये व फक्त आठ अथवा अकरा अक्षरांमध्ये असलेले मंत्र. यामध्ये विशाल असा आशय दडलेला आहे. म्हणजेच मंत्र कितीही अक्षरांनी अथवा शब्दांनी निर्माण झालेला असो. त्याचे चरण लघुवृत्तामध्ये अथवा महत वृत्तामध्ये, त्या मंत्राचा आशय सदैव विशिष्ट ज्ञान तत्त्वांनी भरलेलाच असतो. एखादे नीतीतत्व, मूल्य कथन केलेलेच असते. म्हणून हिंदूंच्या महावाङ्मयात,महाग्रंथात प्रत्येक मंत्र महामंत्र आहे.

## ***त्यागभाव भोग मंत्र***

हाही मंत्र अथवा यजुषही शुक्ल यजुर्वेदातील आहे. हा मंत्रही अत्यंत सुंदर,रसाळ, ओजस्वी व विशाल आशयाने भृत आहे. याखेरीज या यजुषाचे महत्त्व इतके महान आहे की या यजुषाचाही प्रयोग हवन तसेच प्रार्थनेसाठी केला जातो. हा यजुष इतका महान आहे की यामध्ये भोगांचा त्याग करणे उचित मानले नाही.कारण भोगांचा, तर पर्यायाने तपाचा त्याग म्हणजे कर्तव्यांचा आणि दायित्वाचा त्याग करणे होय. म्हणून भोग करावा मात्र त्यागभावाने, मात्र कसे? भोग करताना मोहाचा त्याग करावा. याखेरीज सार्वभौमत्वाची संकल्पनाही यात जाणवते. या मंत्रात असे म्हटले आहे, “हे विश्व ईश्वराचे आहे.”

***तेन त्यक्तेन भुजिंथा***

***मागृध: कि स्य स्विध्दनम्॥***

या यजुषाचा असा अर्थ आहे की या इहलोकामध्ये असलेल्या सुख-सुविधा, भोगोपभोग व रत्ने, धन, सत्ता व सिंहासन अथवा अधिकार ग्रहण करावेत. त्या सर्वांचा भोग करावा. मात्र या सर्व भोगांचा मोह धरु नये. या भोगांची लालसा धरता कामा नये. कारण हे विश्व, ब्रम्हांड, अंतरिक्ष, या विश्वातील प्रत्येक वस्तू, रत्ने, धन, सत्ता, सुखोपभोग व अधिकार हे परमेश्वराची निर्मिती आहेत, सर्वांची नव्हे. या सर्वांवर ईश्वराचा सार्वभौमिक व सार्वत्रिक अधिकार आणि छत्र आहे.

या यजुषाच्या आशयपूर्वीच्या यजुषाप्रमाणेही आध्यात्मिकही आहे. त्याकारणे मी आध्यात्मिक दृष्टीने पाहता, असे लिहिणार नाही. मात्र मी हे स्पष्टीकरण निश्चितच लिहीत आहे, या यजुषातच सार्वभौम एकछत्री हिंदवी

साम्राज्य तथा अखंड चक्रवर्ती साम्राज्य सार्वभौम एकछत्री प्रशासनाची संकल्पना मांडलेली आहे. म्हणजेच फ्रेंच संविधान अथवा अमेरिकेच्या मानवी हक्कांच्या जाहिरनामा यात एकछत्री शासनाची संकल्पना सर्वप्रथम आलेली नाही. ती मूलतःच असलेली वैदिक संस्कृतीच्या चक्रवर्ती सम्राट या संकल्पनेतच सामावलेली आहे. म्हणजेच भारतीय हिंदू संस्कृतीत सार्वभौम एकछत्री शासन प्रशासनाची संकल्पना मूलतःच होती.

## ***विश्वबंधुत्व यजुष***

विश्वबंधुता ही संकल्पना सोफिस्टाच्या तत्त्वज्ञानात तसेच कॉस्मोपॉलिटन संकल्पनेत असल्याचे म्हटले जाते. मात्र ही विश्वबंधुता सर्वप्रथम ऋग्वेदात आढळते आणि यजुर्वेदातही आढळते. जसे की राष्ट्री म्हणजे राष्ट्राची माता -म्हणजे राष्ट्राचे सर्व प्रजाजन एकमेकांचे बंधुबांधव लागतात, तर राष्ट्रोत्थान प्रार्थनेतही सर्व बंधुबांधव प्रजाजनांचे, पशु, पक्ष्यांचे हित करण्यासाठी प्रार्थना केली आहे. त्याप्रमाणे या यजुषामध्येही यज्ञदेवाला यजोमान असे वचन देतो की तो या विश्वातील प्रत्येक प्राणीमात्राला-मनुष्याला मित्र वा बंधु मानेल.

हा मंत्र किंवा यजुष पुढीलप्रमाणे:-

***मित्रस्यांह माचक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षान्ताम्||***

या यजुषाचा असा अर्थ आहे की या जगतातील, या विश्वातील, या ब्रम्हांडातील, या भूतलावरील, या अंतरीक्षातील,स्वर्गातील, नरकातील व अन्य लोकातील देवता, मानव, यक्ष, गंधर्व, असूर, प्राणी, पशु, पक्षी आदि भूतमात्रांकडे- या सर्वांकडे आपण मित्र,बंधु अशा आप्तेष्ट रुपाने, दृष्टीने पाहावे, आम्ही यजमान-यजोमती हे वचन देत आहोत की आम्ही अशी दृष्टी निश्चितच जोपासू. त्याकरिता हे यज्ञदेवते स्वाहा व अग्नि! आपण कृपया आम्हाला शक्ती, धैर्य, संयम, उचितज्ञता म्हणजेच विवेकही प्रदान करावा, जेणेकरून आम्ही विश्वबंधुत्वाचा संकल्प करु शकू, हे देवतांहो!

म्हणजेच हा मंत्र अथवा यजुषही महान व सुरेखच नव्हे, तर त्याचे विश्वबंधुत्वाच्या संकल्पनेतही महान योगदान आहे. याशिवाय लिंगपुराणातही ‘आत्मवत् सर्वभूतेषु

पश्यति सः पण्डिता’ असेच म्हटले आहे, लिंगपुराणाला शिवपुराण असेही संबोधले जाते. त्याच लिंगपुराणात हा सुंदर श्लोक आला आहे, ज्याचा अर्थ असा आहे की जो व्यक्ती सर्व भुतमात्रांमध्ये आत्मवत् दृष्टीने बंधुत्व दृष्टीने पाहतो म्हणजे सर्वांमध्ये एकच ईश्वर पाहतो, तीच व्यक्ती खरी विद्वान अथवा विदुषी होय, पंडित अथवा पंडिता होय. म्हणजेच या मंत्रात आणि वरील यजुषांमध्ये समान बोध विभिन्न प्रकारे व पद्धतीने कथन केलेले आहे. म्हणूनच हा विश्व सख्यत्वाचा यजुष मला अत्यंत प्रिय वाटतो. यात फक्त विश्वबंधुत्व कथन केलेले नाही, तर विश्वाशी सख्य करण्याची संकल्पना कथन केली आहे.

## ***देशरक्षण व मातृसन्मान मंत्रयजुष***

देशाचे अथवा राष्ट्राचे संरक्षण करण्यासाठी देशरक्षण यजुषाचा प्रयोग केला जातो. ह्या यजुषाचाही प्रयोग देशहितार्थ केल्या जाणाऱ्या अग्निहोत्रात केला जातो, अग्निहोत्री परंपरा ही यज्ञसंस्कृती व हिंदू वैदिक धर्माच्या रक्षणासाठी निर्माण झालेली आहे,म्हणूनच अग्निहोत्रामध्ये राष्ट्रहिताच्या यजुषाचाही उपयोग केला जातो. आपण पूर्वीच राष्ट्रोत्थान प्रार्थना वाचली होती. तिचे विवेचन ही वाचले होते. मात्र हा मंत्र यजुर्वेदातील ३६ व्या अध्यायातील २२ वा श्लोक अथवा यजुष आहे. हा देशरक्षण मंत्र महान आहे. हा यजुष अथवा श्लोक पुढीलप्रमाणे:-

***यतो यत: समीहसे ततो नो अभयं कुरु॥***

या यजुषाचा अर्थ असा आहे की हे परमप्रकृती आणि हे परमात्मा! आम्ही सर्वजण ज्या राष्ट्राचे प्रजाजन आहेत. त्या राष्ट्रांमध्ये देवतांचा वास आहे व ज्या राष्ट्राच्या कणाकणांमध्ये तुम्हां उभयंताचे अस्तित्व व आशिष आहे, त्या राष्ट्रांमध्ये आम्हा सर्वांना भयमुक्त, संकट मुक्त, आक्रमण मुक्त, सुखी, आनंदी, कीर्ती मंडित व भक्तीमयी जीवन देता. तुम्ही आम्ही सर्वांना अभयदान प्रदान करावे.

म्हणजेच या महान ऋषिमुनींनी दिव्य दृष्टीने देशरक्षणासाठी व धर्म रक्षणाकरिता उपाय सर्वप्रथम शोधले होते. परंतु त्या उपायांचे पालनही व्हायला हवे होते. मात्र धर्म रक्षणाकरिता आज विशेष उपाय असे होत नाहीत म्हणजे अल्पश: होताहेत.

दुसरा यजुष आहे तो मातृ सन्मानाचा. आपल्या हिंदू संस्कृतीत ‘मातृदेवो भव:’असे म्हटले जाते. याशिवाय

मातेला देवाहून, परमात्म्याहून महान मानले जाते म्हणूनच ही संस्कृती मातृ अथवा स्त्री-अधीन आहे. नवरात्री, कन्यापूजन, कन्यादान, कन्याशिक्षण व ब्रम्हवादिनी आदि सांस्कृतिक क्रिया-प्रक्रियांद्वारे स्त्री, कन्या, पत्नी, माता अशा प्रत्येक रुपाला पूजले जाते, सन्मान दिला जातो. या यजुषाचा उल्लेख यजुर्वेदामध्ये चौथ्या अध्यायातील दुसरा श्लोक आहे. ह्या श्लोकामध्ये एक माता आपल्या अपत्यासाठी काय काय करते हे थोडक्यात कथित केले आहे. हा यजुष मंत्र पुढीलप्रमाणे:-

***विश्वं हि रिप्रं प्रवहन्ति देवी:***||

या यजुषाचा असा अर्थ आहे की या विश्वात दिव्य माता आपल्या पुत्री-पुत्रा्च्या समस्त पापांचे, दुःखाचे, क्लेशांचे, वेदनांचे, दोषांचे व पातकांचे क्षालन करतात व निवारणही करतात. हा यजुष निश्चितच आदिशक्तीला व तिच्या अनंत रुपांना समर्पित आहे.

एक माताच असते, जी आपल्याला घडविते. त्याच्या-तिच्या व्यक्तीमत्त्वातील गुणांचे संवर्धन करत असते. त्याचे-तिचे दोष काढून टाकते. किंबहुना आपल्या अपत्याचा हिताकरिता झटत असते म्हणूनच कोणतीही माता दिव्य तेव्हाच ठरते, ज्याक्षणी ती आपल्या अपत्याच्या व्यक्तीमत्त्वातील दोष, त्रुटी आदि काढून टाकण्याचा पूर्ण प्रयास करते म्हणूनच भारतीय हिंदू वैदिक संस्कृतीमध्ये अनुशासन आणि दोष निवारणाला अधिक महत्त्व दिले गेले आहे. या संस्कृतीमध्ये 'मातृदैवोभव:' 'जननीजन्मभूमिश्च स्वर्गादपिगरीयसी' असे श्लोक का म्हटले जातात, हेच वरील यजुषाकारणे कळून येते.

## परिशिष्ट

१) कण्डिका :- काण्ड.

२) सर्पणशील :- आकाशापासून धरतीपर्यंत.

३) सृजन :- निर्मिती.

४) पराविद्या :- तत्वज्ञान, आन्वीक्षिकी.

५) अभिष्ट :- इच्छित असलेले, कल्याणप्रद.

६) राष्ट्रोत्थान :- राष्ट्राची प्रगती

७) पुरंध्री :- स्त्री

८) सताहुती :- सत् करिता (स्वतः) दिलेली आहुती.

९) यजोमती :- यजमानांची पत्नी किंवा यज्ञ करणारी.

१०) होत्रदान:- होत्रामध्ये आहुती देणे.

११) उत्तिष्ठत:- जागृत होणे किंवा उठणे.

१२) वरान्निबोधत :- ज्ञानी व्यक्तीकडून ज्ञान प्राप्त करणे.

१३) सद्वस्तूमीमांसा :- सत्ता शास्त्र, अध्यात्म.

१४) मनीषीजन :- इच्छा करणारे.

१५) त्रायन :- रक्षण करणे.

१६) पवमान :- महान.

१७) यजुष :- यजुर्वेदातील मंत्र, यज्ञ करताना बोलले जाणारे मंत्र.

१८) महाग्निचयन :- एक प्रकारचा यज्ञ

१९) प्रसृत :- प्रसार किंवा विस्तार करणे.

२०) द्युलोक :- स्वर्ग लोक

२१) ऋत :- त्रिकालाबाधित सत्य, सृष्टीचा त्रिकालाबाधित नियम.

२२) प्रसुप्त :- लपलेले किंवा दडलेले, दडवलेले.

## संदर्भ ग्रंथांची सूची

१) हिंदू तत्त्वज्ञान

२) ऋग्वेद

३) यजुर्वेद

४) ब्राह्मण पुराण

५) महाभारत

६) द्रौपदी

७) तेजस्वी द्रौपदी – वि. वा. वर्तक.

८) देवी पुराण

९) देवी सप्तशती

१०) देवी महात्म्य

११) प्रज्ञाविवर्धन स्तोत्र

१२) यजुर्वेद संहिता

१३) उपनिषदे- बृहदारण्यकोपनिषद ईशवास्योपनिषद

१४) विकिपीडिया- विकिसूक्ती

१५) नित्योपासना


१६) व्यासोच्छिष्ट


हे पुस्तक कसे वाटले, हे shaktileelanikita@gmail. com या माझ्या इमेल आयडीवर रिप्लाय देऊन कळवा.


निकिता पाटील यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके





पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर क्लिक करा








# निकिता पाटील यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके















## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्षं.

## निकिता पाटील यांचं ई साहित्यवरचं हे बारावं पुस्तक.

निकिता राजेश पाटील ही विद्यार्थिनी मूळची डोंबिवलीची असून सद्यकालात तिचे वास्तव्य काही वर्षांपासून वांगणीत आहे. कुटुंबात लेखनाचा वा साहित्याचा वारसा असा नाही. पण अगदी शालेय वयातच तिला लेखनाची ऊर्मी शांत बसू देईना. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत तिने पूर्ण पुस्तक होईल इतके लिहिले. नंतर मराठी साहित्याचा रितसर अभ्यास करून आता ती साहित्याच्या वेगवेगळया रसांच्या निर्मितीचा अनुभव घेत आहे. तिने लिहिलेल्या यापुर्वीच्या पुस्तकांचे कौतुक जाणकार वाचकांनी केले आहे.

अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. पण त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकविक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आली नाही तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता इंटरनेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत नेण्याचे काम अनेक संस्था करत आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ६ लाख वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यचे प्रयत्न चालू आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ

वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, कुमार सोनावणे, प्रतिक उकले, सुजाता सिद्धा, गायत्री रोडे, मनोज कळमकर, काजल दळवी, सचिन बोरसे, कार्तिकी भट, डॉ. प्रितम दरवडे, अमोल गवळी, निकिता पाटील, संजीवनी देशपांडे, अंकिता शिंदे, काजल दळवी, दिपूजा चव्हाण असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?